## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४/२००७

निर्णय दिनांक २७-०४-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. रणजित नामदेव चव्हाण, रा. पिंपरखेड पोस्ट हिवरा तालुका आष्टी जिल्हा बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय आष्टी जिल्हा बीड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार आष्टी जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. रणजित नामदेव चव्हाण, यांचे वतीने त्यांचे वकील श्री. नितीन चव्हाण (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय आष्टी जिल्हा बीड श्री. आर. पी. बोरसुरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार आष्टी जिल्हा बीड हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक २७-१०-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून आर. डी. कटारिया अर्धघाऊक रॉकेल विक्रेते कडा तालुका आष्टी जिल्हा बीड यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> ‘‘ १) शिधापत्रक किती, २) एकूण रॉकेल किती ३) कोणत्या गावांना पुरवठा करता ३) रॉकेल शिधापत्रका प्रमाणे की माणसी येते, व माणसी किती, ४) गाडी भाडे कोण देते ५) रॉकेल विक्री दर (ग्रामीण) किती ६) प्रत्येक दुकानात रॉकेल विक्रीचे फलक आहेत काय ७) जे मजूर ऊसतोडीला जातात ते रॉकेलचे काय केले जात.’’

सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या सदर माहितीच्या अर्जास अनुसरुन विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांचेकडे ०७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील तहसील कार्यालय आष्टी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००६ रोजी पोहोचले आहे हे अपीलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या अपीलाच्या झेरॉक्स वर संबंधित लिपीकाची सही व तहसील कार्यालय आष्टी यांचा शिक्का आहे यावरुन हे अपील प्रथम जन अपीलीय अधिकारी यांना प्राप्त झाले असल्याचे अनुमान काढण्यास हरकत नाही. तथापि या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे त्यांच्या या म्हणण्यास जन माहिती अधिकारी आज सुनावणीमध्ये दुजोरा देत आहे. अपीलीय अधिकारी यांच्या या वर्तनाची नोंद जिल्हाधिकारी बीड यांनी यथायोग्य रित्या घ्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित माहिती प्राप्त झाली नाही व जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपील करुन ही कोणताही निर्णय घेतला नसल्याने व्यथित होऊन

अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांनी ही माहिती तयार करुन घेऊन दिनांक ०२-०१-२००७ रोजी अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयातून घेणे संदर्भात सुचित केले होते. सदर माहिती अपीलार्थीने दिनांक १५-०२-२००७ रोजी प्राप्त करुन घेऊन आता त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे अपीलीय अधिकारी यांचेकडे लिहून दिले आहे. अपीलार्थीने मागणी केलेली माहिती वस्तुतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे हे रॉकेल पुरठयावरील नियंत्रणाच्या दृष्टीने आवश्यक आहे तथापि जन माहिती अधिकारी यांना ही माहिती ज्यांच्याशी संबंधित आहे त्या व्यापा-याकडून मागविल्याचे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. स्वतःच्या कार्यालयास माहिती उपलब्ध असतांना देखील पुरवठादाराकडे अपीलार्थीने मागणी केलेली माहिती विचारण्याची त्यांची ही कृती शासकीय कार्यालयाच्या नियमित पध्दतीशी विसंगत असल्याचे दिसून येते.

माहिती देण्यास विलंब लागल्याची कारणे विचारता वरील कालावधीमध्ये सार्वजनिक निवडणुका असल्यामुळे या कामाकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळाला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये सांगितले आहे तथापि हे कारण पटण्यासारखे नाही. या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही समर्थन जन माहिती अधिका-यास, त्यांना पुरेशी संधी दिल्यानंतरही, देता आले नाही.

या प्रकरणी अपीलार्थीस माहिती देण्यासाठी देय कालावधीपेक्षा एकूण ३७ दिवस इतका असमर्थनीय विलंब झालेला आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की संबंधित जन माहिती अधिकारी, यांनी अपीलार्थीस माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये केलेल्या

माहितीच्या अर्जानुसार माहिती देण्यासाठी कोणत्याही वैध कारणाशिवाय एकूण ३७ दिवसाचा विलंब लावल्यामुळे, माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) मधील तरतुदी नुसार प्रतीदिन रुपये २५० याप्रमाणे ३७ दिवसाचे एकूण रुपये ८२५० (अक्षरी रुपये आठ हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येते. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी, एकाच हप्त्यात शासकीय कोषागारात, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत भरावयाची आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय तिजोरीत भरल्याची खात्री जिल्हाधिकारी बीड यांनी करुन घ्यावी व त्याप्रमाणे अनुपालन अहवाल आयोगास दिड महिन्याच्या आत पाठवावा. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

महसूल विभागातील पुरवठा शाखेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे वारंवार अपिल व तक्रारी दाखल होत आहेत. अशा परिस्थितीत विभागातील पुरवठा अधिकारी व त्यांच्या हाता खालील काम करणारे तहसीलदार, नायब तहसीलदार यांना माहिती अधिकार कायदा २००५ च्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्या संदर्भात महसूल आयुक्त यांनी गांर्भीयाने विचार करावा, असेही त्यांना या प्रकरणी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (८) (जे) अन्वये सुचित करण्यात येत आहे. तव्दतच औरंगाबाद महसूल विभागा मार्फत प्रत्येक शासकीय गोडावून मध्ये किती प्रकारच्या धान्याचा किती साठा उपलब्ध आहे याची माहिती नियमितपणे त्यांच्या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी ठेवण्याच्या संदर्भात त्यांनी विचार करावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी, त्यांनी कोणत्याही वैध कारणा शिवाय अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ३७ दिवसाच्या विलंबाप्रित्यर्थ प्रतिदिनी रुपये २५० या प्रमाणे एकूण रुपये ८२५० इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी एकाच हप्त्यात व हे आदेश निर्गमित झाल्या पासून ३० दिवसाचे आत शासकीय कोषागारात भरावी.

३. सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरल्याची जिल्हाधिकारी बीड यांनी खात्री करुन घ्यावी व हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाचे आत त्याचा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रणजित नामदेव चव्हाण, रा. पिंपरखेड पोस्ट हिवरा तालुका आष्टी जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय आष्टी जिल्हा बीड

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार आष्टी जिल्हा बीड

४ जिल्हाधिकारी बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/९६/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक २३ एप्रिल, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती.लक्ष्मी नारायण पुरी<br>मु.पो.पांगरी कॅम्प ता.परळी,<br>जिल्हा- बीड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | शाखा प्रमूख (महसूल शाखा)<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>परभणी. | .. | प्रतिवादी |
| २. | जिल्हाधिकारी,परभणी | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्रीमती लक्ष्मी नारायण पुरी (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हया हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा शाख प्रमूख (महसूल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी हे गैरहजर आहेत. जन अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी श्री.गावंडे व्ही.एन ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दिनांक- १५-१२-२००६ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांनाच जनमाहिती अधिकारी संबोधून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"२२-११-२००६ नंतर आलेल्या नोटींगप्रती वारसाफेर करणे बाबत.

६१ आर जमिनीचा वारसांच्या नावे फेरफार मंजूर करणे बाबत."

अपिलार्थी हे दारिद्री रेषेखाली असल्याचे त्यांना सदर अर्जात नमूद केले असून ही माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षीली होती.

तद्नंतर अपिलार्थीने परत दिनांक- १८-०१-२००७ जिल्हाधिकारी, परभणी यांच्या नावाने माहिती मिळविण्यासाठी परत एक अर्ज करुन त्यामध्ये दिनांक- २२-११-२००६ नंतर झालेल्या नऊ पानी नोटींगच्या प्रती मिळण्या बाबत व वारसा फेरफार मंजूर करण्या बाबत अशा प्रकारची माहिती मागविली आहे.

अपिलार्थीच्या वरील अर्जावरुन अपिलार्थीस निश्चीतपणे कोणत्या सर्वे नंबरच्या जमिनीचा तपशील हवा आहे व निश्चीतपणे काय हवे आहे. याचा अर्थबोध होत नाही.

तद्नंतर अपिलार्थीने माहिती अधिकार कायद्यातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे अपिल न करता आयोगाकडे सरळ दिनांक-२२-०१-२००७ रोजीचे अपिल दिनांक- ०५-०२-२००७ रोजी दाखल केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीस हवी असलेली माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातून मूळ अर्ज त्यांच्याकडे परत पाठवून महसूल शाखेने अपिलार्थीचा अवमान केला आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व त्याबद्दल संबंधितास योग्य ती शास्ती लावावी, असे त्यांनी आयोगाकडे दुसरा अर्ज केला आहे त्यात म्हटले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक- २००७, दिनांक- २३-०३-२००७ अन्वये त्यांचे म्हणणे आयोगा समोर सादर केले आहे.

सदरच्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीने अर्जा सोबत दारीद्र रेषे खाली असल्या बाबत दर्शविणारा पुरावा म्हणजे शिधापत्रिका त्यासोबत जोडली नसल्यामूळे सदर मूळ अर्ज दिनांक- २९-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविला, असे म्हटले आहे, त्याच बरोबर अर्जदारास प्रथम अपिलाचा पर्याय उपलब्ध असतांना तो न वापरता आयोगाकडे सरळ व्दितीय अपिल केले असल्याने अपिलार्थीचे अपिल टेनेबल नाही म्हणुन निकाली काढावे अशी आयोगांस विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या संदर्भीय अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस जिल्हाधिकारी कार्यालय परभणी चे पत्र दिनांक- ०९-०२-२००७ अन्वये तहसीलदार परळीवैजनाथ, जिल्हा-बीड यांच्या मार्फत आवश्यक ती माहिती पोष्टाने पाठविली . तथापि तहसीलदार परळीवैजनाथ, जिल्हा बीड यांनी त्यांचे पत्र दिनांक-०५-०३-२००७ अन्वये सदर अर्जदार हे दिलेल्या पत्यावर राहात नसून पाठविलेली कागदपत्रे परत पाठविण्यात येत आहेत असे कळवून हे पत्र जिल्हाधिकारी परभणी यांना परत पाठविले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात स्वतःचा पत्ता हेतूपूरस्सर बरोबर नमूद केला नाही, असे जिल्हाधिकारी, परभणी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीस प्रथम माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसीलदार परळीवैजनाथ यांच्या मार्फत दिनांक- ०९-०२-२००७ रोजी पाठविली होती. तथापि अपिलार्थी यांचा पत्ता दिलेल्या ठिकाणी अपिलार्थी हे राहत नसल्याच्या कारणावरुन सदर माहिती तहसीलदार परळी वैजनाथ यांनी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे परत पाठविली व अंतिमतः दिनांक- ०८-०३-२००७ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांनी स्वतः अपिलार्थीस ही माहिती दिल्याचे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

या प्रकरणी तहसीलदार परळी वैजनाथ यांनी तपासणी न करता कार्यालयामध्ये बसून संबंधित तलाठी यांच्या संगनमताने अपिलार्थी हे दिलेल्या पत्यावर राहत नाहीत, असे खोटे कळवून ही माहिती अपिलार्थी यांना मिळाली आहे किंवा नाही याबाबत प्रयत्न केला नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तेंव्हा या प्रकरणी महसूल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी तलाठी परळी वैजनाथ व तहसीलदार परळीवैजनाथ यांची या प्रकरणातील तक्रारी बाबत चौकशी करुन यथायोग्य कार्यवाही करावी.

अपिलार्थीने प्रथम अपिल प्रथम अपिलिय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे न करता सरळ दुसरे अपिल राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-०५-०२-२००७ रोजी केले आहे. आता अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली सर्व माहिती दिनांक- ०८-०३-२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामूळे तसेच सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी आज आयोगासमोर सुनावणीमध्ये कबूल केल्यामुळे अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे. त्याच बरोबर जिल्हाधिकारी परभणी यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सर्व संबंधित जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी प्रमाणे कोणत्याही नागरीकाचा माहिती मागविण्याचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर, कायद्यामध्ये विहित केलेल्या मुदतीत, अपिलार्थीस माहिती देऊन त्यावर या

कायद्याची उद्दिष्ठे लक्षांत घेऊन सकारात्मक कार्यवाही करावी, अशा प्रकारच्या सूचना द्याव्यात. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २३ एप्रिल,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्रीमती.लक्ष्मी नारायण पुरी मु.पो.पांगरी, कॅम्प- परळीवैजनाथ जि.बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा शाखा प्रमूख (महसूल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६. श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७

निर्णय दिनांक २३-०४-२००७

कादरी सै. फारुक आलम सै. नुरुद्दीन, : अपीलार्थी

हाशमीयॉ मोहल्ला परतूर जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी :

नगरपालिका परतूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त : प्रतिवादी

सा. प्र. विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. सैय्यद फारुक आलम हे स्वतः हजर होते, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपालिका परतूर जिल्हा जालना श्री. महेश अजबराव वडदकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त सा. प्र. विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांचे प्रतिनिधी सौ. मंजुषा मुथा तहसीलदार नगरपालिका प्रशासन विभागीय

आयुक्त कार्यालय औरंगाबाद या हजर आहेत. अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) श्री. मुगळीकर हे थोड्या उशीराने हजर झाले.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक २५-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " सन १९९१ च्या घर नं. १०६५ चे रजिस्टर रिव्हीजनची व १९९० पर्यतच्या रिव्हीजन रजिस्टरची साक्षांकित प्रत तसेच पुर्वी कोणाचे नावे होती व रिव्हीजन रजिस्टरला सन १९९१ मध्ये नामांतर कोणत्या पुराव्याने करण्यात आले त्या पुराव्याची माहिती साक्षांकित करुन देणे. "

अपीलार्थीच्या वरील अर्जाची प्रथम दखल जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००६ रोजी घेतल्याचे त्यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या पत्रासोबत त्यांनी अपीलार्थीने मागणी केलेल्या १९९१ च्या रिव्हीजन रजिस्टरची घर नंबर १०६५ ची नक्कल व १९९१ पुर्वीचे रिव्हीजन रजिस्टर जे १९७७-७८ मध्ये तयार केलेले त्यामधील घर नंबर १०६५ ची नक्कल देण्यासाठी तयारी दर्शविली व दोन्हीची फी रुपये १०० इतकी नगरपरिषदेच्या कार्यालयात भरुन देण्याविषयी सुचित केले.

अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपीलाची सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अंतीमतः दिनांक २४-११-२००६ रोजी घेऊन अपीलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिका-

यास अपीलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपीलार्थीस सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्याचे आदेश दिले. सदर आदेश दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रस्तुत केले आहेत.

तथापि वरील आदेशानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले असून सोबत मूळ मागणी कायम ठेवली आहे व जन माहिती अधिकारी यांचेवर कलम २० (१) अन्वये कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी अपीलार्थीस प्रथम दिनांक १०-११-२००६ रोजी व नंतर दिनांक १८-०१-२००७ रोजी आवश्यक असलेली माहिती विनामुल्य पुरविली आहे. तथापि अपीलार्थी यांचे यावर समाधान झाले नसून अपीलार्थीच्या या मिळकतीवर १९९०-९१ रोजी झालेले नामांतर कोणत्या पुराव्याने झाले आहे या पुराव्याची नक्कल अपीलार्थीस अद्यापही प्राप्त झालेली नाही त्यामुळे अपीलार्थी व्यथित झाले आहेत असे अपिलार्थीनी सुनावणी मध्ये सांगितले आहे.

संबंधित मिळकतीवर अपीलार्थीचे नाव वैध मार्गाने येण्यासाठी योग्य ती कारवाई महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील योग्य त्या कलमांचा वापर करुन, ही प्रक्रिया सुरु करण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये दर्शविली आहे. ही प्रक्रिया पूर्ण करण्यास त्यांना तीस दिवस इतका कालावधी लागणार असल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये पुढे सांगितले.

या प्रकारे अपीलार्थीच्या गा-हाण्याची तड लागली असली तरी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथमतः माहिती देण्यास विलंब लावला आहे हे या प्रकरणी सिध्द होत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील अशाच प्रकारचा निष्कर्ष त्यांच्या अपीलामध्ये काढला आहे. अपीलार्थीने मागितलेली माहिती व अपीलार्थीस प्रथम दिलेले उत्तर यामध्ये कोणत्याही वैध कारणाशिवाय ४६ दिवसांचा विलंब लावल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या विलंबाचे कोणतेही समर्थन जन माहिती अधिकारी आज सुनावणीत देऊ शकले नाहीत. हा विलंब लावल्याने जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे ४६ दिवसांचे रुपये ११५५० ( अक्षरी रुपये आकरा हजार पाचशे पन्नास ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. तव्दतच त्यांनी अपीलार्थीने प्रथमतः मागणी केलेल्या माहितीचे अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती वस्तुस्थितीसह अपीलार्थीस ७ दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी व अपीलार्थीस अपेक्षित असलेली मालमत्ता हस्तांतरणासंबंधी प्रक्रिया तात्काळ सुरु करुन हे निकालपत्र जारी झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत अंतिम करावी.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी नुसार रुपये ११५५० ( अक्षरी रुपये आकरा हजार पाचशे पन्नास ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कादरी सै. फारुक आलम सै. नुरुद्दीन, हाशमीयॉ मोहल्ला परतूर जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपालिका परतूर

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त सा. प्र. विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३/१२३/०७

निर्णय दिनांक २३-०४-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरजमल गिरधारीलाल जैन (गंगवाल)<br>व्दारा ओम ट्रेडिंग कंपनी, जाफरगेट<br>औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा<br>अधिकारी औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर<br>जिल्हाधिकारी औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सिताराम परशुराम राठोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी

औरंगाबाद गैरहजर आहेत. अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे अनुपस्थितीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने प्रथम दिनांक २३-११-२००६ रोजी औरंगाबाद शहरातील पाच अर्धघाऊक परवाना धारकांना देण्यात आलेल्या साठा परवान्याच्या नकला मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. सदर पाच परवानाधारक खालील प्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र ऑईल
२. सपना ऑईल
३. एलोरा ऑईल
४. संदीपकुमार चॉदमल जैन
५. आर. एस. जमधडे

या सर्व अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्याच्या साठा परवान्याच्या नकला देण्याबाबत अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने अतिरिक्त जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यावर प्रथम सुनावणी दिनांक २९-०१-२००७ रोजी ठेवण्यात आली होती तथापि त्या दिवशी अपीलार्थी गैरहजर असल्यामुळे प्रथम सुनावणी होऊ शकली नाही. तदनंतर दिनांक १४-०२-२००७ रोजी या प्रकरणाची अपीलीय अधिकारी यांनी अंतीमतः सुनावणी ठेवली व त्याच

दिवशी जन माहिती अधिकारी यांना संबंधित माहिती विना विलंब व विना शुल्क पुरविण्याचे आदेश अपीलीय अधिकारी यांनी दिले व अपील निकाली काढले.

तथापि या निर्णयावर देखील समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने व्यथित होऊन दिनांक ०३-०२-२००७ रोजी राज्य आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी विशिष्ट अशी मागणी केली नसून सोबत संचिकेची प्रत जोडली आहे असे म्हटले आहे. यावरुन अपीलार्थीने त्यांची मूळ मागणी कायम ठेवली असल्याचे अनुमान काढता येते.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती वेळेत देण्याच्या दृष्टीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अर्ज मिळाल्यानंतर लगेच दिनांक २४-११-२००६ रोजी अपीलाच्या सुनावणीसाठी बोलाविले होते. अपीलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती घेण्याकरिता कोठे जावे म्हणजे कोणाकडे अर्ज करावा हे कळविणे अपेक्षित होते. तथापि दिनांक २४-११-२००६ रोजीची सदर सुनावणी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००६ रोजी ठेवली होती. तथापि सदर दिवशी अपीलार्थी सुनावणीस हजर झाले नाहीत. तदनंतर दिनांक ०१-१२-२००६ रोजी त्यांनी अपीलार्थीस अपर जिल्हा दंडाधिकारी औरंगाबाद यांचे कार्यालयाशी संपर्क साधण्याविषयी सुचित केले.

यावर अपीलार्थी यांनी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी अपील केले आणि या अपीलाची सुनावणी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी दिनांक

१४-०२-२००७ रोजी ठेऊन सुनावणीच्या दिवशी अपीलार्थी यांना अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सपना ऑईल व संदीपकुमार जैन या दोन साठा परवानाधारकांच्या प्रती देण्यात आल्या.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपर जिल्हादंडाधिकारी औरंगाबाद यांना साक्षीसाठी बोलाविले होते त्याप्रमाणे ते आयोगाच्या समोर हजर झाले आहे. त्यांनी वरील प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करतांना सांगितले की अपीलार्थीने मागणी केलेल्या पाच साठा धारकापैकी तीन साठा धारकांच्या (महाराष्ट्र ऑईल, एलोरा ऑईल व आर. एस. जमधडे) साठा परवान्याच्या प्रती पोलीस आयुक्त यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उर्वरीत दोन (सपना ऑईल व संदीपकुमार चॉदमल जैन) यांच्या साठा परवानाच्या प्रती अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असल्याने अपीलार्थीने मागितलेल्या वरील पाच साठा परवान्याच्या प्रती अपीलार्थीस अपिलाचे दिवशीच म्हणजे दिनांक १४-०२-२००७ व १७-०४-२००७ रोजी पुरविल्या आहेत. या सर्व प्रकरणाच्या घडामोडीमध्ये जन माहिति अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जाणुन बुजून उशीर लावल्याचे सिध्द होत नसल्याने त्यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ही सुनावणी चालू असतांना अपीलार्थीचे कथित प्रतिनिधी श्री. अन्वरखॉ सरदारखॉ पठाण हे हजर झाले. सदर प्रतिनिधीस अपर जिल्हादंडाधिकारी हे ओळखत असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी सुनावणीमध्ये कबूल केले आहे. आता अपीलार्थीस त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती मिळाली असल्याचा अर्ज अपिलार्थीचे सहीने त्यांनी सादर केला असल्याने सदर अपील निकाली काढण्यात येत आहे. सदर माहिती अपीलार्थीस मिळाल्याचे आयोगापुढे सादर केलेल्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अपिलार्थीच्या पत्रावरुन दिसून येते. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

# निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरजमल गिरधारीलाल जैन (गंगवाल) व्दारा ओम ट्रेडिंग कंपनी, जाफरगेट औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/१२४/रामाआ/औ'बाद.

निर्णय दिनांक २३ एप्रिल २००७

१ श्री.अमोल बंकटराव जाधव : अपीलार्थी
मु.पो.दारफळ, ता.जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :
तहसिलदार, उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. अमोल बंकटराव जाधव (येथून पुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), यांचे कथित भाऊ श्री.नरसिंग बंकटराव जाधव, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद, श्री.र.रा.गायकवाड ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत. तथापि अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद ( येथून पुढे त्यांना जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक- १४-०७-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"दारफळ येथील गट नंबर ८५ मधील विस्तारवाडीचा ले-आऊट नकाशा मिळणे बाबत."

यावर जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलार्थी यांना दिनांक- १३-०८-२००६ रोजी अगर तत्पूर्वी द्यावयास हवी होती ती माहिती देखील दिनांक- २१-०४-२००७ रोजी ८ महिन्याचा कालावधी लोटून गेल्यानंतर व व्दितीय अपिलाच्या सुनावणीचे पत्र गेल्यानंतरअपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थी यांचा मूळ अर्ज प्राप्त झाल्या नंतर सदरची माहिती देण्याचा जनमाहिती अधिकारी यांनी प्रयत्न केला होता. परंतू त्यांचे कार्यालयाकडून सदर रजिष्टर गहाळ झाले असल्यामूळे त्यांना ही माहिती वेळेवर देता आली नाही. असे जनमाहिती अधिकारी हे आज झालेल्या सुनावणीमध्ये कबूल करीत आहेत. तथापि तद्नंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २१ एप्रिल, २००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आज रोजी शपथेवर कबूल करीत आहे.

अपिलार्थीस सदरची माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने प्रथम अपिल दिनांक -०४-०९-२००६ रोजी केले आहे. यावर प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अंतिमतः दिनांक - १५-१२-२००६ रोजी त्यांचेकडील निर्णय पारीत केला. त्यामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी, तहसीलदार, उस्मानाबाद यांनी विनाविलंब संचिकेचा शोध घेवून अपिलार्थी यांना मौजे.दारफळ, तालूका जिल्हा उस्मानाबाद येथील मागणी केलेला गावठाण विस्तार वाढीचा लेआऊट नकाशा उपलब्ध करुन द्यावा, वादीस कळवावे. या प्रमाणे सूचना दिल्या. या निर्णयामध्ये कोणतीहि कालमर्यादा जनमाहिती अधिका-यास विहित करुन दिली नाही. याचा येथे आवर्जून उल्लेख करणे गरजेचे आहे.

तथापि या निर्णयावरही  कार्यवाही न झाल्याने व्यथीत होवून  अपिलार्थीचे कथीत भाऊ (श्री.नरसिंग बंकटराव जाधव) यांनी आयोगाकडे व्दितीय अपिल दिनांक- ०३-०२-२००७ रोजी केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५  अन्वये केलेल्या अर्जामधील अपिलार्थीची स्वाक्षरी तसेच माहिती अधिकारी कायदा २००५ मधील १९ (१) अन्वये केलेल्या प्रथम अपिलामध्ये अपिलार्थीची स्वाक्षरी या सारख्याच आहेत परंतू व्दितीय अपिलामध्ये १९ (३) अवये केलेल्या अपिलावर अपिलार्थीची स्वाक्षरी म्हणून मूळ अपिलार्थीचे कथीत भाऊ श्री.नरसिंग  बंकटराव जाधव यांनी स्वाक्षरी केली आहे. वास्तविकतः मूळ अर्ज प्रथम अपिलिय अर्ज व व्दितीय अपिलिय अर्ज हे सर्व अर्ज करणारी व्यक्ती एकच असणे  कायद्याव्दारे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी  व्दितीय अपिल १९ (३) खाली वेगळया रितीने केले असल्यामूळे सदर अपिल खारीज करण्यात येत आहे.

आज दिनांक- २३-०४-२००७ रोजी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तहसीलदार, उस्मानाबाद यांनी  अपिलार्थीस त्यांचे मूळ अर्जातील संपूर्ण माहिती दिल्याचे त्यांचे दिनांक - २३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे निवेदन दिले आहे व त्या निवेदानामध्ये त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्यामूळे आता अपिल निकाली काढण्याची विनंती केली आहे.

तथापि तहसीलदार उस्मानाबाद यांनी सादर केलेल्या पोंच पावतीवरील म्हणजेच दिनांक- २१-०४-२००७ रोजी दिलेल्या पोंच पावतीवरील  अपिलार्थीची स्वाक्षरी पहाता, ही स्वाक्षरी अपिलार्थीने  केलेली नसून अपिलार्थीचे कथीत भाऊ श्री.नरसिंग बंकटराव जाधव यांनी केल्याची दिसते.

एकंदरीत मूळ केलेल्या अर्जावरील, प्रथम अपिल व व्दितीय अपिल व माहिती प्राप्त झाल्या प्रित्यर्थ अपिलार्थी यांनी केलेल्या स्वाक्षरीमध्ये फरक दिसून येत आहे.

सबब हे अपिल खारीज करण्यात येत आहे. या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य चोखपणे न बजाविता त्यांनी त्यांचे वर्तनातून कर्तव्यपरायणता व दक्षतेचा अभाव स्पष्ट केला आहे. कोणत्याही जमिनीचे रेकॉर्ड व तत्संबंधी रजिष्टर हे कायमस्वरुपी ठेवण्यासाठी वर्गीकृत ( अ-वर्ग) केले असणार यात शंका नाही. तथापि हे रजिष्टरच तहसील कार्यालयातून गहाळ होणे, त्यासंबंधी पोलीसात कोणतीहि तक्रार न नोंदविणे, अपिलार्थीकडून माहिती दिल्याची पोच घेतांना त्यांच्या स्वाक्षरीची शहानिशा न करणे या गोष्टी आयोगास अनाकलनीय आहेत व नेमक्या याच बाबीतून जनमाहिती अधिकारी यांचेमधील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट होतो. तेंव्हा या प्रकरणी सचिव (महसूल) यांनी तहसीलदार, उस्मानाबाद यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी, व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास चार महिन्यात सादर करावा. असे त्यांना माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (२) चे तरतुदीनुसार आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल खारीज करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांच्यावर सचिव (महसूल)मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नाागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ अवये योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास चार महिन्यात सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २३ एप्रिल २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद**

प्रत-

१. श्री.अमोल बंकटराव जाधव, मु.पो.दारफळ, तालूका जिल्हा- उस्माााबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्माााबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. विभागीय आयुक्त औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६. सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई यांनी वरील प्रमाणे नोंद घेण्यासाठी.

७. श्री.दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या बेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

८. निर्णयनस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८/२००७

निर्णय दिनांक २४-०४-२००७

श्री. शरद कुलकर्णी (भुमीपुत्र) ४, आर्या : अपीलार्थी
टॉवर्स ए. डी. सी. ए. स्टेडियम जवळ एन-२,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी :
अभियंता ल. पा. (स्था. स्तर) विभाग
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक : प्रतिवादी
अभियंता ल. पा. (स्था. स्तर) मंडळ कार्यालय
औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ल. पा. (स्था. स्तर) विभाग औरंगाबाद श्री. संजय दिगंबरराव डोणगावकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ल. पा. (स्था. स्तर) मंडळ कार्यालय औरंगाबाद

श्री. ज. मा. लिहितकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक २६-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या आवारात चालू असलेल्या नवीन इमारतीच्या विद्युती करणा संदर्भात काही माहिती विचारली होती. विद्युतीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक व मान्यता, विद्युतीकरणाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, विद्युतीकरणाची काढलेली निविदा, व प्राप्त झालेल्या दरांचे तुलनात्मक विवरणपत्र, कार्यारंभ आदेश, सार्वजनिक बांधकाम (विद्युतीकरण) यांचा तपासणी अहवाल व बील अदा केल्याचा तपशील (इत्यादीच्या प्रती) असे मुद्दे या माहितीमध्ये समाविष्ट होते. सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली असून अपेक्षित माहितीचा कालावधी म्हणून आर्थिक वर्षे २००५-०६ असा उल्लेख केलेला आहे.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिका-यांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपीलार्थीने आपल्या मुळ माहितीची मागणी कायम ठेवली असून संबंधित जन माहिती अधिका-यावर कलम १९ (१) व २०(१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याचे अपेक्षिले आहे.

अपीलार्थीच्या या दिनांक ०४-१२-२००६ च्या अपिल अर्जावर जन अपीलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी दिनांक ०२-०३-२००७ रोजी घेतली. या सुनावणीच्या वेळेसच, सदर इमारती चे काम झाले नसल्याने हे काम झाले नाही असे अपीलार्थीस लेखी पत्र

दिले.  सदर पत्र अपीलार्थीस मिळाल्याची नोंद उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे उप विभाग औरंगाबाद यांनी आयोगास दाखविली.

विहीत मुदतीत प्रथम अपिलाची सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ३१-०१-२००७ रोजी अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. राज्य माहिती आयोगाकडे हे अपील करणे व नंतर त्यावर सुनावणी सुरु होणे याच्या मध्यंतरीच्या कालावधीत अपीलर्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली असल्यामुळे अपीलार्थी चे अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपीलार्थीने प्रथम माहितीचा अर्ज दिनांक २६-०९-२००६ रोजी सादर केला. माहिती अधिकार कायदा २००५ मधील विहीत तरतुदीनुसार अपीलार्थीस दिनांक २५-१०-२००६ पुर्वी ही माहिती जन माहिती अधिका-याने देणे अपेक्षित होते तथापि ही माहिती त्यांनी अपीलार्थीस दिनांक ०२-०३-२००७ रोजी दिल्याचे दिसते.  म्हणजे अपीलार्थीस ही माहिती अंदाजे चार महिने सात दिवस इतक्या, कोणत्याही वैध कारणाशिवाय झालेल्या, उशीराने, दिली गेल्याचे दिसते.  अपिलार्थीने ज्या कामासंदर्भात माहिती मागविली होती ते काम जन माहिती अधिका-याच्या खात्याच्या इमारती संदर्भात होते व हे काम त्यांच्या व अपिलीय अधिका-याच्या कार्यालयीन आवारात चालू होते यामुळे या कामाची दैनंदिन प्रगती जन माहिती अधिका-यास असणे, सर्वसाधारणपणे अपेक्षित आहे. अपीलार्थीने मागणी केल्यानंतर अपीलार्थीस ‘ काम झालेले नाही ’ ही साधी माहिती जन माहिती अधिका-यास विना विलंब व विहित मुदतीत देणे सहज शक्य होते तथापि त्यांनी ते तसे केल्याचे आढळून येत नाही. कोणत्याही वैध कारणा शिवाय अपीलार्थीस सुमारे चार महिने सात दिवस इतक्या उशीराने माहिती देण्यात येते.  यासारखा दुसरा बेजबाबदारपणा नाही असे आयोगाचे मत झाले आहे.

जन  माहिती अधिका-यास आज सुनावणीमध्ये संधी देऊन देखिल ते ही माहिती उप अभियंता कार्यालयाकडून वेळेत आली नाही, याशिवाय कोणतेही वेगळे समर्थन देऊ शकले नाहीत. हे समर्थन या परिच्छेदात वर उल्लेखिलेल्या परिस्थितीत कोणत्याही सुज्ञ व्यक्तीस मान्य करता येणार नाही.  सबब जन माहिती अधिका-यास या माहिती देण्यास केलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० (जास्तीत जास्त मर्यादा) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपीलावर विहित कालावधी पेक्षा उशीराने सुनावणी घेतली त्याच्या या प्रमादाची नोंद सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्य घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.  प्रथम सुनावणीस व व्दितीय सुनावणीस अपीलार्थीस गैर हजर असल्यामुळे व अपीलार्थीस अपेक्षित माहिती मिळाली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती विहित मुदतीपेक्षा चार महिने सात दिवस इतक्याने विलंबाने दिली असल्यामुळे प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरद कुलकर्णी (भुमीपुत्र) ४, आर्या टॉवर्स ए. डी. सी. ए. स्टेडियम जवळ एन-२, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ल. पा. (स्था. स्तर) विभाग औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ल. पा. (स्था. स्तर) मंडळ कार्यालय औरंगाबाद

४ सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई यांना आवश्यक त्या नोंदी घेण्यासंदर्भात.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/९५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २४ एप्रिल, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कांबळे चतुरंग रामदास (मुख्यसंपादक) साप्ताहिक किनवटचा चतुरंग, कार्यालय, सिध्दार्थ नगर, जेतवन बौध्द विहार, जवळ किनवट-४३१८०४ जिल्हा- नांदेड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषी अधिकारी, तालूका कृषी अधिकारी कार्यालय, किनवट, जि.नांदेड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी किनवट, जिल्हा-नांदेड. | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २४ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.कांबळे चतुरंग रामदास (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तांत्रीक कृषी अधिकारी, तालूका कृषी अधिकारी कार्यालय, किनवट, श्री.जी.के.टारपे ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी,किनवट, श्री. एन.व्ही.नईमवाढ ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक- २०-०९-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कामाच्या बदल्यात धान्य, राष्ट्रीय रोजगार हमी योजना, मराठवाडा पाणलोट  विकास मिशन, आदिवासी उपयोजना, केंद्र सरकार व राज्य सरकारकडून, या योजनांतर्गत किनवट कृषी विभागाकडे २००५-२००६ मध्ये प्राप्त निधी, खर्च निधी, शिल्लक निधी व करण्यात आलेल्या प्रत्येक कामाचे, कामाचे नाव, गावाचे नांव,  योजनेचे संपूर्ण नाव, यंत्रणेचे नाव, मंजूर निधी व कार्यारंभ दिनांक, कामपुर्ती दिनांक, कामांची आजची स्थिती , प्रत्यक्ष काम  घेणा-या अधिका-याचे नाम व पदनाम, आपल्या उपविभागीय अधिकारी यांनी कामास भेटी दिल्याच्या तारखा, काम केलेल्या मजुरांची उपस्थिती दर्शक हजेरी पत्रकांच्या छायांकीत प्रती (मस्टर), मजुरांना धान्य वितरण करण्यासाठी शिफारस केलेले स्वस्त धान्य दुकानाचे नाव, पत्र जा.क्र. व दिनांक , मजुरास धान्य वितरण केलेल्या तारखा, या १३ मुद्यांवर माहिती प्रत्येक मंडळ कृषी कार्यालया निहाय मागितली होती.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेंक्षीली  होती.

सदर माहिती विस्तृत स्वरुपाची व वेगवेगळया मंडळ कार्यालयाकडून घेवून संकलन करावयाची असल्यामूळे त्याला वेळ लागणार होता. त्यासाठी प्रथमतः जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- जाक्र/ताकृअ/तंत्र/मा.अ./१३२३/०६, दिनांक- २०-१०-२००६ रोजीच्या पत्रा व्दारे अपिलार्थीस सदर माहिती दिनांक- २०-११-२००६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना पोष्टाव्दारे कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले आहे.

अपिलार्थी आज गैरहजर असल्यामुळे सदर पत्र अपिलार्थीस पोंहचले किंवा नाही हे कळण्यास मार्ग नाही. सदर पत्र अपिलार्थीस साध्या पोष्टाने पाठविले आहे व सदर पत्र अपिलार्थी यांना पोंहचल्या बाबतचा कोणताही पुरावा जनमाहिती अधिकारी आयोगा समोर सादर करु शकले नाहीत. त्यामूळे हे पत्र खरेच पाठविले किंवा कसे, ही शंका घेण्यास भरपूर वाव राहतो, सबब विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद यांनी तालूका कृषी अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थी यांना पाठविलेले पत्र क्रमांक ताकृअ/तंत्र/मा.अ.१३२९/०६, दिनांक- २०-१०-२००६ रोजीचे पत्र तालूका कृषी अधिकारी, किनवट यांच्या कार्यालयाकडून खरोखरच पाठविले आहे किंवा कसे, याबाबत स्वतः शहानिशा करावी व त्यांचा अनुपालन अहवाल राज्य माहिती आयोगास १५ दिवसाच्या आत पाठवावा.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-११-२००६ रोजी प्रथम अपिल केले.

सदर अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २३-०१-२००७ रोजी प्रथम सुनावणी यांच्या कार्यालयात घेतली. प्रथम सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी गैरहजर असल्याचे अपिलावर दिलेल्या निर्णयाच्या प्रतिवरुन दिसून येते.

अपिलार्थी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हजर राहण्याचे सूचित करुनही गैरहजर राहिले, त्यांना प्रथम अपिल सुनावणीचा निर्णय जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २५-०१-२००७ रोजी कळविला होता व त्यामध्ये सर्व माहिती तयार

असल्याचे व ती अपिलार्थीस देण्याची तयारी जनमाहिती अधिकारी यांनी दर्शविली असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हजर न राहता, दिनांक- २० जानेवारी, २००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले आहे.

अपिलार्थी हे दोन्हीही सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्यामूळे अपिलार्थीस माहितीची आवश्यकता नाही, असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी शासकीय कार्यालयाकडून विस्तृत प्रमाणात माहिती मागविणे व तद्नंतर सदर माहिती घेण्या संदर्भात सदरच्या कार्यालयाकडे न जाणे, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित न राहता व्दितीय अपिल राज्य माहिती आयोगाकडे सादर करणे व राज्य माहिती आयोगाच्या झालेल्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीसाठी सुध्दा अनुपस्थित राहणे, अशा प्रकारे सुनावणीच्या कामी गैरहजर राहण्याच्या अपिलार्थी यांच्या वृत्तीची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे. अपिलार्थी यांनी भविष्यात असा प्रकार टाळावा, अशी त्यांना आयोगा तर्फे समज देण्यात येत आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने प्रथम अर्जा व्दारे मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून ती वेगवेगळया कर्मचा-याकडून घेवून संकलित करावयाची असल्यामूळे ही माहिती तयार करण्यास उशिर झाला आहे. असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने दिलेली सदर माहिती एकूण ८४० पृष्ठांची असल्याचे त्यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले. तव्दतच ही माहिती दिनांक- २३-०१-२००७ रोजी प्रथम सुनावणीच्या वेळी तयार होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती

व्यक्तीशः अपेक्षिली असल्यामूळे जनमाहिती अधिकारी हे अपिलार्थीची वाट बघत राहिले व अंतिमतः तालूका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील शिपाया मार्फत ही माहिती अपिलार्थीस दिनांक- २९-०१-२००७ रोजी देण्यात आली. असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. या पृष्ठयर्थ सदर माहिती मिळाल्याची पोंच अपिलार्थी यांने त्यांच्याकडे दिली आहे. त्याची प्रत त्यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये आयोगा समोर सादर केली आहे.

अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करुन प्रथम व व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहीले व त्यांना सदर माहिती मिळाल्याची पोंचपावती जनमाहिती अधिकारी हे आज आयोगा समोर सादर करीत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

या प्रकरणी कृषी विभाग, तालूका कृषी अधिकारी किनवट व त्यांच्या सहकारी अधिकारी/ कर्मचारी यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यासत्यतेची तपासणी विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद यांनी करुन त्यांचा अनुपालन अहवाल १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा, असेही त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

२. विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद यांनी तालूका कृषी अधिकारी किनवट यांच्या कार्यालयाकडील अपिलार्थीस केलेल्या पत्रव्यवहाराची आवक जावक

रजिष्टरची तपासणी करावी, अपिलार्थीस माहिती मिळाल्याची खात्री करुन घ्यावी व अनुपालन अहवाल आयोगास पंधरा दिवसात पाठविण्यात यावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २४ एप्रिल,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.कांबळे चतुरंग रामदास (मुख्यसंपादक) साप्ता.किनवटचा चतुरंग, कार्यालय, सिध्दार्थ नगर, ‘ जेतवन बौध्द विहार’ जवळ
किनवट-४३१८०४ जिल्हा- नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा तांत्रीक कृषी अधिकारी, तालूका कृषी अधिकारी कार्यालय, किनवट, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, किनवट यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ विभागीय कृषी सहसंचालक, जालना रोड, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेंवून आवश्यक कार्यवाहीस्तव.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१/२००७

निर्णय दिनांक २५-०४-२००७

श्री. नितिन रामचंद्र गांधी रा. कडा साखर कारखाना तालुका आष्टी जिल्हा बीड : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅंक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड :

२ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे : प्रतिवादी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी यांचे वकील श्री. महेश काबरा (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे स्वतः हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅंक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. अंबादास कवरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

हे हजर आहेत.  जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक २४-१०-२००५ रोजी, त्यांच्या विरुध्द संस्थेने निबंधक / न्यायालयाकडे दाखल केलेल्या वसुली प्रकरणी संदर्भात माहिती मागितली होती. माहितीचा विषय कर्ज व ठेव व्यवहार असा होता.

''१ माझे (आष्टी शाखा) कर्ज खात्याचा क्रमांक १३ व्याज दरासह व एन पी ए तारखेसह उतारा.

२ एक रकमी परतफेड बाबत रिझर्व बॅंकेची योजना

३ संस्थेने स्विकारलेले आदर्श उपविधी – कर्ज व्यवहार नियमांसह

४ संस्थेने वेळोवेळी सन १९९७ पासून लागू केलेले कर्ज (पी एल आर सह) वरील व्याजदर व दंड व्याजदर.

५ संस्थेने वेळोवेळी सन १९९७ पासून लागु केलेले ठेवी वरील व्याजदर

६ संस्थेने वेळोवेळी सन १९९७ पासून वाटप केलेले लाभांश दर

७ माझा कर्ज मागणी अर्ज, संस्थेने केलेली पडताळणी (अपरायझल), वचनचिठ्ठी व जामीनदारांचा करारनामा व इतर कर्ज करारनामे बाबतची माहिती

८ मे. नितीन किराणा स्टोअर्स व मी धारण केलेले मुदत ठेव, शेअर्स व लाभांश बाबत माहिती

९ मे. नितीन किराणा स्टोअर्स व माझे विरुध्द कलम १०१ अन्वये

संस्थेने मिळविलेला दाखला

१० माझे (आष्टी शाखा) वाहन कर्ज खात्याचा क्र. २८ व्याज दरासह एन पी ए तारखेसह उतारा

सदर माहिती अपीलार्थीने १९९९ ते २००५ या कालावधीकरिता व रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपीलार्थीच्या या मागणीच्या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००५ रोजी अपीलार्थीस, महाराष्ट्र नागरी सहकारी बॅंक्स फेडरेशन लिमिटेड मुंबई यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिनियम २००२ मधील तरतुदी नागरी सहकारी बॅकांना लागू होत नाही असे कळविलेले आहे त्यामुळे बॅकेस आपल्या अर्जानुसार माहिती देता येणार नाही असे कळविले आहे. अपीलार्थीच्या प्रथम अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेले हे उत्तर बरोबर नाही कारण दिनांक ०१-१०-२००५ रोजी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ हा कायदा निरसित झाला होता त्यामुळे जन माहिती अधिका-याची ही कृती म्हणजे अपीलार्थीस एक प्रकारे माहिती नाकारण्याचे कृत्य असे म्हणता येईल. १२ ऑक्टोंबर २००५ पासून केंद्रीय माहिती अधिकार हा संपूर्ण देशात लागू झाला असल्यामुळे त्यांचे हे कृत्य ही माहिती नाकारणारी कृती असे म्हणता येईल. जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे आपले अपील दिनांक ०७-०१-२००६ रोजी दाखल केले. सदर अपीलाची कोणत्याही प्रकारची सुनावणी अपीलीय अधिकारी यांनी घेतली नाही व त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक अवनि/केमाअ/०५/अपील क्रमांक २८/२००६/क्र. ४१० दिनांक २१-०२-२००६ अन्वये अपीलार्थीच्या सदर अपीलाची सुनावणी या कार्यालयास घेता येणार नाही

असे कळविले. सुनावणी न घेण्याचे कारण म्हणजे सदर सहकारी बॅकेचा समावेश सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत होत नसल्यामुळे, असा दिलेला आहे. अपीलीय अधिकारी यांचा सदर सहकारी बॅक हे शासकीय प्राधिकरण नाही म्हणून केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ हा या बॅकेस लागू होत नसावा असा विचार असावा.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संदर्भाच्या पत्रावरुन त्यांना सदरच्या अपीलाची सुनावणी त्यांच्या कार्यालयास घेता येणार नाही असे कळविल्याचे दिसते व त्याच बरोबर त्यांनी या नकाराविरुध्द अर्जदारास मुख्य राज्य माहिती आयुक्त यांचेकडे अपील करण्याची सूचना दिली आहे. जर त्यांना अपीलाची सुनावणी घेता येणे कायद्यातील तरतुदीशी विसंगत वाटत होते तर त्यांनी अपीलार्थीस राज्य माहिती आयोगा कडे जाण्याची सूचना करण्याची आवश्यकता नव्हती. त्यांनी अपीलाची सुनावणी घेतली नाही, सुनावणीस अपीलार्थीस बोलाविले नाही व अपीलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे जाण्याविषयी सूचना दिली ही त्यांची कृती भरपूर विसंगत आहे असे आयोगास वाटते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथित होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०३-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर व्दितीय अपील मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालयात दिनांक १३-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. या व्दितीय अपीलामध्ये अपीलार्थी यांनी त्यांची मूळ माहिती ची मागणी कायम ठेवली असून जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्याची राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी यांनी १० मुद्दयावर माहिती मागविली आहे. अपीलार्थीने मागणी केलेल्या, १० मुद्दयापैकी ५ मुद्दे (क्रमांक २, ३, ४, ५, ६ ) हे सर्वसाधारण स्वरुपाचे असून ५ मुद्दे ( क्रमांक १, ७, ८, ९, १० ) वैयक्तीक स्वरुपाचे आहेत. तसेच अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्यांनी बॅंकेकडून स्वतः घेतलेल्या कर्जासंबंधी आहे. बॅंकेने त्यांचे दुकान जप्त करुन वसुलीची कार्यवाही सुरु केली आहे त्यांचेजवळ कर्जासंबंधी कोणतीही कागदपत्रे नाहीत.

वरील सर्व बाबी तसेच बॅंकेतर्फे माहिती न देण्यासंबंधी दिलेली कारणे व त्यावरील आयोगाचे अभिप्राय इत्यादीचा सविस्तर उहापोह आज दिनांक २५-०४-२००७ रोजी झालेल्या दुस-या अपील प्रकरणी (श्री. अनिल रामचंद्र गांधी विरुध्द जन माहिती अधिकारी दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅंक लि. परळी अपील क्रमांक १०३/२००७) मध्ये दिलेल्या निर्णयात करण्यात आला आहे. त्या प्रकरणाप्रमाणेच या प्रकरणीही अर्जदारास त्याचे कर्जाखात्यासंबंधी ची माहिती आवश्यक आहे. बॅंकेतर्फे दिनांक ०३-०४-२००७ रोजी व्यक्तीशः ही माहिती पुरविण्यात आल्याचे सांगण्यात आले तथापि सदर माहितीच्या प्रमाणित प्रती आवश्यक असल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे. अपीलार्थीस आवश्यक माहिती बॅंकेने देणे आवश्यक आहे. वरील सर्व विवेचन व दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे आदेशित करण्यात येते की

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना वरील १ ते १० मुद्दयावरील माहिती हे निकालपत्र मिळाल्यानंतर ३ दिवसात द्यावी. माहितीच्या सर्व प्रती ह्या साक्षांकित केलेल्या व

वाचण्यायोग्य असाव्या.  अपीलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून त्याची पोहोच पावती बॅंकेने स्वतःकडे ठेवावी ही माहिती बॅंकेने अपीलार्थीस विनामुल्य पुरवावी.

२.     अपीलार्थीस माहिती न देण्यामागे कोणत्याही प्रकारचा असद्‌हेतू जन माहिती अधिकारी यांचा नव्हता त्यामुळे व त्याच बरोबर सहकार आयुक्त यांचे वर नमूद केलेले परिपत्रक पाहता त्यांनी मुद्दाम कोणतीही गैर कृती केल्याचे सिध्द होत नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशित करण्यात येत नाही.

**निर्णय**

१.     अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                   ( वि. बा. बोरगे )

दिनांक     २५ एप्रिल २००७                  राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१     श्री. नितीन रामचंद्र गांधी रा. कडा साखर कारखाना तालुका आष्टी जिल्हा बीड
२     जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅंक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड
३     जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे
४     श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
५     निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३/२००७

निर्णय दिनांक २५-०४-२००७

श्री. अनिल रामचंद्र गांधी रा. कडा साखर कारखाना तालुका आष्टी जिल्हा बीड : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅंक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड :

२ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे : प्रतिवादी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी यांचे वकील श्री. महेश काबरा (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅंक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. अंबादास कवरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे हे गैरहजर आहेत.

२. या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक २४-१०-२००५ रोजी, त्यांच्या विरुध्द संस्थेने निबंधक / न्यायालयाकडे दाखल केलेल्या वसुली प्रकरणी संदर्भात खालील प्रमाणे १० मुद्यांवर माहिती मागितली होती. माहितीचा विषय कर्ज व ठेव व्यवहार असा होता. ही माहिती प्रामुख्याने त्यांच्या खात्याशी संबंधित होती.

''१ माझे (आष्टी शाखा) कर्ज खात्याचा क्रमांक ३५ व्याज दरासह व एन पी ए तारखेसह उतारा.

२ एक रकमी परतफेड बाबत रिझर्व बँकेची योजना

३ संस्थेने स्विकारलेले आदर्श उपविधी – कर्ज व्यवहार नियमांसह

४ संस्थेने वेळोवेळी सन १९९९ पासून लागू केलेले कर्ज (पी एल आर सह) वरील व्याजदर व दंड व्याजदर.

५ संस्थेने वेळोवेळी सन १९९९ पासून लागु केलेले ठेवी वरील व्याजदर

६ संस्थेने वेळोवेळी सन १९९९ पासून वाटप केलेले लाभांश दर

७ माझा कर्ज मागणी अर्ज, संस्थेने केलेली पडताळणी (अपरायझल), वचनचिठ्ठी व जामीनदारांचा करारनामा व इतर कर्ज करारनामे बाबतची माहिती

८ मे. महावीर कृषि सेवा केंद्र व मी धारण केलेले मुदत ठेव, शेअर्स व लाभांश बाबत माहिती

९ मे. महावीर कृषि सेवा केंद्र व माझे विरुध्द कलम १०१ अन्वये संस्थेने मिळविलेला दाखला

१० माझे जामीनदाराचे श्री. रामचंद्र गांधी यांचे घर क्रमांक १४३/२ विरुध्द सन २००३ साली संस्थेने केलेली जप्ती व लिलाव कारवाई पंचनामा माहिती.''

३. सदर माहिती अपीलार्थीने १९९९ ते २००५ या कालावधीकरिता व रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

४. अपीलार्थीच्या या मागणीच्या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००५ रोजी अपीलार्थीस, महाराष्ट्र नागरी सहकारी बॅक्स फेडरेशन लिमिटेड मुंबई यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिनियम २००२ मधील तरतुदी नागरी सहकारी बॅकांना लागू होत नाही व त्यामुळे बॅकेस आपल्या अर्जानुसार माहिती देता येणार नाही असे कळविले आहे. अपीलार्थीच्या प्रथम अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेले हे उत्तर बरोबर नाही कारण दिनांक ०१-१०-२००५ रोजी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ हा कायदा निरसित झाला होता व १२ ऑक्टोंबर २००५ पासून केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ हा संपूर्ण देशात लागू झाला आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-याची ही कृती म्हणजे अपीलार्थीस एक प्रकारे माहिती देण्यास नाकारणारी कृती असे म्हणता येईल. जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे आपले अपील दिनांक ०७-०१-२००६ रोजी दाखल केले. सदर अपीलाची कोणत्याही प्रकारची सुनावणी अपीलीय अधिकारी यांनी घेतली नाही व त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक अवनि/केमाअ/०५/अपील क्रमांक २९/२००६/४१३ दिनांक २१-०२-

२००६ अन्वये अपीलार्थीच्या सदर अपीलाची सुनावणी या कार्यालयास घेता येणार नाही असे कळविले. सुनावणी न घेण्याचे कारण म्हणजे सदर सहकारी बॅंकेचा समावेश सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत होत नसल्यामुळे, असा दिलेला आहे. अपीलीय अधिकारी यांचा हे पत्र अपिलार्थीस पाठवितांना सदर नागरी सहकारी बॅंक हे शासकीय प्राधिकरण नाही म्हणून केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ हा या बॅंकेस लागू होत नाही या विचाराच्या पार्श्वभूमीवर पाठविले असावे असे वाटते.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००६ च्या अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रावरुन त्यांना सदर अपीलाची सुनावणी त्यांच्या कार्यालयास घेता येणार नाही असे कळविल्याचे दिसते व त्याच बरोबर त्यांनी या नकाराविरुध्द अर्जदारास मुख्य राज्य माहिती आयुक्त यांचेकडे अपील करण्याची सूचना दिली आहे. जर त्यांना अपीलाची सुनावणी घेणे कायद्यातील तरतुदीशी विसंगत वाटत होते तर त्यांनी अपीलार्थीस राज्य माहिती आयोगा कडे जाण्याची सूचना करण्याची आवश्यकता नव्हती. त्यांनी अपीलाची सुनावणी घेतली नाही, अपीलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे जाण्याविषयी सूचना दिली ही त्यांची कृती विसंगतीपूर्ण आहे असे आयोगास वाटते.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथित होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०३-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर व्दितीय अपील मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालयात दिनांक १३-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. या व्दितीय अपीलामध्ये अपीलार्थी यांनी त्यांची मूळ माहिती ची मागणी कायम

ठेवली असून जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्याची राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे.

७. या प्रकरणाची प्रथम सुनावणी दिनांक २२-०१-२००७ रोजी घेण्यात आली त्यावेळी प्रथम अपीलीय अधिकारी व सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांनी, अर्जदाराला स्वतःच्या खात्याविषयी संबंधित बॅकेकडून माहिती देण्याला कोणत्या कायद्यान्वये प्रतिबंध केला आहे, हे शपथपत्राव्दारे आयोगाला सादर करण्याबद्दल निर्देश देण्यात आलेले होते. या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०३-०४-२००७ रोजी घेण्यात आली त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे वतीने त्यांचे वकीलांनी लेखी जबाब सादर केला. अपीलीय अधिकारी यांनी मुदतवाढ मागितल्यावरुन पुढील सुनावणी दिनांक २५-०४-२००७ रोजी ठेवण्यात आली.

८. आज दिनांक २५-०४-२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी यांनी १० मुद्दयावर माहिती मागविली आहे. त्यापैकी मुद्दे क्रमांक १, ७, ८, व ९ हे चार मुद्दे त्यांच्या स्वतःशी संबंधित आहे, एक मुद्दा क्र. १० त्रयस्त पक्षाशी संबंधित आहे तर उर्वरीत पाच मुद्दे क्र. २, ३, ४, ५ व ६ हे सर्वसाधारण माहितीच्या स्वरुपाचे आहेत.

९. सहकारी बॅकेतर्फे अपीलार्थीने मागितलेली माहिती नाकारण्याची दोन कारणे पुढे करण्यात आलेली आहेत. त्यापैकी एक कारण म्हणून महाराष्ट्र अर्बन को ऑपरेटिव्ह बॅक फेडरेशन यांचे दिनांक १७ मार्च २००५ रोजीचे पत्र आयोगासमोर सादर करण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये महाराष्ट्र राईट टु इनफर्मेशन ॲक्ट २००२ हा कायदा नागरी सहकारी बॅकेला लागू नसल्याचे मत प्रदर्शित करण्यात आले आहे. तथापि अपिलार्थीने प्रथम माहितीचा

अर्ज ज्या दिवशी केला त्या दिवशी केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ हा अस्तित्वात आलेला असल्यामुळे व त्या आधारावरच अपीलार्थीने माहितीची मागणी केली असल्यामुळे बॅकेने अपीलार्थीस या मुद्दयावरुन माहिती नाकारणे हे गैरलागू ठरते. माहिती न देण्याचे दुसरे कारण सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे दिनांक ०८-०२-२००६ चे परिपत्रक असे त्यांनी दर्शविले आहे. या परिपत्रकामध्ये सहकारी पत संस्था या नागरी सहकारी बॅकांना हा कायदा लागू होत नसल्याचे स्पष्टपणे उल्लेखिलेले आहे.

१०. सहकार आयुक्त यांच्या वरील परिपत्रकासंबंधी त्यांना राज्य माहिती आयुक्तांनी शपथपत्र दाखल करण्यास दिनांक २२-०१-२००७ रोजी सूचना दिली होती परंतु त्यांनी अद्याप पर्यत आयोगाने उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत आयोगाकडे शपथपत्र दाखल केले नाही तथापि त्यांनी (दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या) साध्या पत्राव्दारे आयोगास या मुद्यावर शपथपत्र स्वरुपात माहिती सादर केली आहे. ज्यामध्ये त्यांनी कळविले आहे की खातेदारास त्याच्या स्वतःच्या खात्याविषयी माहिती देण्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये प्रतिबंध करण्यात आलेला नाही तथापि या कायद्याच्या कलम ३२ अनुसार संस्थेच्या सभासदांला ही माहिती देता येते.

११. सहकार आयुक्तांनी सदर ०८-०२-२००६ चे त्यांचे कार्यालयीन परिपत्रका संबंधी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल करण्यात आलेली असून मा. न्यायालयाने अद्याप कोणताही निर्णय दिला नसल्याचे कळविले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे हा आयोग त्याविषयी कोणतेही मत प्रदर्शित करीत नाही. त्याच बरोबर सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदींना आधीन राहूनही सदर नागरी सहकारी बॅक अपीलार्थीस

त्याने मागितलेली माहिती देऊ शकले असते. या प्रकरणी एक बाब आणखी स्पष्ट करणे गरजेचे वाटते ती म्हणजे केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलम २२, २४ व २७ मधील तरतुदी विचारात घेता महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या कायद्यामध्ये जरी काही असले व त्या माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीशी विसंगत असतील तरी माहिती कायद्यातील तरतुदी बंधनकारक राहतील तसेच कोणत्याही गुप्तवार्ता अथवा सुरक्षा संघटना ज्यांना केंद्र शासनाने अधिसुचने व्दारे दुस-या अनुसुचीत समाविष्ट केले नसेल त्यांना केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी लागू राहतील हे स्पष्ट होते.  या प्रकरणी सहकार आयुक्तांनी एक कार्यालयीन परिपत्रक काढून सर्व नागरी सहकारी बॅकांना माहितीच्या अधिकाराच्या कक्षेबाहेर करणे ही बाब त्यांच्या अधिकारक्षेत्रात येत नसून याबाबत केंद्र शासनातर्फे जारी केलेल्या अधिसूचने व्दारेच अशा सहकारी संस्थांना वगळता येईल असे आयोगाचे मत आहे.

१२.  या प्रकरणी आणखी एक बाब म्हणजे सदर परिपत्रकात फक्त संस्थेस देण्यात येत असलेल्या अथवा नसलेल्या आर्थिक मदतीपुरताच विचार करुन संस्था माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत येत नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.  त्यावेळी या कायद्याच्या कलम मधील शासकीय प्राधिकरणाच्या कलम २ (एच) व्याख्येमध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन आदेशाव्दारे घटित केलेले प्राधिकरण व ज्यावर शासनाचे नियंत्रण आहे असे प्राधिकरण (संस्था) स्वयंशासित संस्था यांचा समावेश होतो.  या ठिकाणी नागरी सहकारी बॅका या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत स्थापन संस्था असून, त्यावर शासनाचे सहकार आयुक्त / निबंधक संस्था यांचेमार्फत पूर्ण नियंत्रण आहे.  नागरी सहकारी बॅकाचे लेखा परिक्षण सहकार खात्यातर्फे केले जाते त्याकरिता ऑडिटरची नेमणूक सहकार विभागातर्फे

केली जाते. या संस्था शासनाच्या पुर्वपरवानगी (Licanse) शिवाय बॅकेचे व्यवहार करु शकत नाहीत हे पाहता त्यांना माहिती अधिकार कायदा लागू होत नाही असे म्हणणे, या बॅकांच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता येण्याचे दृष्टीने माहिती अधिकार कायद्यानुसार होणारी मदत रोखण्याचा प्रयत्न आहे असे आयोगाचे मत आहे.

१३. तथापि या प्रकरणी सहकार आयुक्तांनी त्यांच्या दिनांक १०-०४-२००७ च्या पत्रात कळविण्याप्रत या बॅका केंद्रीय माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत येतात किंवा कसे याबाबत मा. उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबीत असून मा. न्यायालयाने कोणतेही अंतरीम/अंतीम आदेश दिलेले नाहीत ही बाब लक्षात घेता सद्यस्थितीत सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीस आधीन राहून तसेच केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी नुसार अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देणे दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅक परळी यांना शक्य होते

या प्रकरणी अपीलार्थी हे दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड चे सभासद व खातेदार आहेत. त्यामुळे अपीलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण दहा मुद्दयापैकी ४ मुद्यांची स्वतः खातेदाराच्या खात्याशी संबंधित माहिती अपीलार्थीस बॅकेने देण्यासाठी काहीच हरकत नाही असे आयोगाचे मत आहे. अपीलार्थीने माहिती मागितलेल्या एकूण दहा मुद्दे पैकी (मुद्दे क्रमांक २, ३, ४, ५ व ६) हे पाच मुद्दे सर्वसाधारण माहितीच्या स्वरुपाचे असून, त्यामध्ये गोपनीय स्वरुपाची कोणतीही माहिती नाही. बॅकेचे कारभारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने ही माहिती बॅकेने स्वतः होऊन त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. ही माहिती ‘‘ माहिती अधिकार कायदा २००५’’ मधील कलम ४ नुसार बॅकेने देणे हा बॅक व्यवहाराचा आवश्यक भाग आहे. आता मुद्दा फक्त अपीलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी शेवटचा मुद्दा क्रमांक १० च्या माहिती

संदर्भात शिल्लक राहतो. त्यामध्ये अपीलार्थीने त्रयस्त पक्षाशी संबंधित माहिती मागितली आहे त्यामुळे या मुद्दयावरील माहिती देतांना बॅकेने माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये कलम ११ चा वापर करुन जन माहिती अधिका-याने निर्णय घेणे उचित राहील.

१४. या प्रकरणी मागितलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता असे आढळले की, अपिलार्थीने स्वतः घेतलेल्या कर्जाच्या वसुली संबंधात, बॅकेने त्यांचे व जामीनदाराचे घर जप्त करुन सील करुन त्यांना बेघर केले असल्याने त्यांना आता या कर्जवसूली संदर्भातील कागदपत्रे पाहण्याचा कोणताच उरला नाही. त्यासंदर्भात न्यायालयात दाद मागण्यासाठी कर्जासंबंधीची कागदपत्रे आजमितीला त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत या परिस्थितीत त्यांना आवश्यक ती कागदपत्रे मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे, व अशी माहिती दिल्यामुळे बॅकेच्या कर्जवसुली वरही चांगला परिणाम होऊ शकतो असे आयोगाचे मत आहे.

१५. आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, त्यांनी प्रथम अर्जाव्दारे केलेल्या मागणीतील माहिती दिनांक ०३-०४-२००७ रोजी (व्दितीय अपिल सुनवणीपुर्वी काही दिवस) व्यक्तीशः दिली असल्या चे ते सुनावणीमध्ये सांगत आहेत तथापि सदर माहिती अनिल रामचंद्र गांधी यांचेशी संबंधित नसून ती नितीन रामचंद्र गांधी यांचेशी संबंधित आहे.त्याच बरोबर अपीलार्थीने त्यांना देण्यात येणा-या सर्व माहितीच्या साक्षांकित प्रती हव्या आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

१६. वरील सर्व परिच्छेदात ऊहापोह केल्यानुसार दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे आदेशित करण्यात येते की,

१. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना वरील १ ते ९ मुद्दयावरील माहिती हे निकालपत्र मिळाल्यानंतर ३ दिवसात द्यावी. माहितीच्या सर्व प्रती ह्या साक्षांकित केलेल्या व वाचण्यायोग्य असाव्या. अपीलार्थी सध्या आजारी माहिती असल्यामुळे सदर माहिती अपीलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावी अथवा दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः द्यावी. ही माहिती बॅकेने अपीलार्थीस विनामुल्य पुरवावी.

२. अपीलार्थीच्या मुद्दा क्रमांक १० च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ११ मधील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करावी. सदर माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी महावीर कृषि सेवा केंद्र यांचे मालक अपिलार्थीच आहेत याची प्रथम खात्री करुन घ्यावी.

३. अपीलार्थीस माहिती न देण्यामागे कोणत्याही प्रकारचा असद्हेतू जन माहिती अधिकारी यांचा नव्हता त्यामुळे व त्याच बरोबर सहकार आयुक्त यांचे वर नमूद केलेले परिपत्रक पाहता त्यांनी मुद्दाम कोणतीही गैर कृती केल्याचे सिध्द होत नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशित करण्यात येत नाही.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल रामचंद्र गांधी रा. कडा साखर कारखाना तालुका आष्टी जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि वैद्यनाथ नागरी सहकारी बॅक लि. परळी वैजनाथ जिल्हा बीड

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७/२००७

निर्णय दिनांक २५-०४-२००७

श्री. नागनाथ ग्यानोबा शिंदे मु. पो. दिग्रस (बु.) तालुका कंधार जिल्हा नांदेड : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती कंधार जिल्हा नांदेड :

२ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड : प्रतिवादी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. नागनाथ ग्यानोबा शिंदे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे स्वतः, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती कंधार जिल्हा नांदेड श्री. जी. जी. आमले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे वतीने प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद

नांदेड श्री. पी. व्ही. बनसोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक २६-०९-२००६ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ चे कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> ‘‘ ग्रामपंचायत दिग्रस (बु.) तालुका कंधार सन २००१ ते ऑगस्ट २००६ पर्यतची ग्रामपंचायतचा आर्थिक व्यवहार मिळणे.
>
> ग्रामपंचायत मालकीचे व्यापारी गाळे
>
> ग्रामपंचायतच्या इमारत बी.एस.एन.एल. भाड्याचा तपशील व ग्रामपंचायत इमारत बॅकेला उत्पन्नाचा तपशील सन ०१ मे ते ३० जून हिशोब व ग्रामपंचायत सभेची मंजुरीबाबत.’’

सदर माहिती अपीलार्थीने दिनांक ०१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट २००६ या कालावधीतील मागितली असून ती माहिती त्यांनी व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या मागणीवरुन अपीलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे त्याचा स्पष्ट अर्थबोध होत नाही. तथापि अपीलार्थीशी चर्चा केली असता त्यांना ग्राम पंचायतच्या सन २००१ ते ३० ऑगस्ट २००६ पर्यतच्या रोखपुस्तिकेच्या प्रती, जिल्हा परिषदे मार्फत बांधलेले गाळे जे सदर ग्रामपंचायत दरवर्षी भाड्याने देते त्या भाड्याचा तपशील व सदर गाळे लिलावाने दिले गेले असल्यास लिलावाच्या प्रक्रियेतील प्रती, त्याच बरोबर ग्रामपंचायतीने बी. एस. एन. एल. ला एक गाळा भाड्याने दिला असून त्या भाड्याचा

तपशील, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेला भाड्याने दिलेल्या इमारतीच्या वापरापोटी सदर बॅकेकडून ग्रामपंचायतीला प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा तपशील. ग्रामपंचायतच्या झालेल्या ऑडिटच्या प्रती व ग्रामपंचायत सभेच्या या सर्व आर्थिक व्यवहारास दिलेल्या मंजुरीच्या प्रती ही माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिका-याकडून अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळाल्या मुळे माहिती अधिकार कायदा २००५ कलम १९ (१) प्रमाणे जन अपीलीय अधिकारी यांचे कडे प्रथम अपील केले. सदर अपील जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याच्या रजिस्टर्ड पत्राची प्रत अपीलार्थीने आयोगा समोर सादर केली. तथापि हे अपील जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाले नसल्याचे जन अपीलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. तर अपीलावर सुनावणी झाली नाही हे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात अशा प्रकारे इतःपर अपिले गहाळ होऊ नयेत अथवा बिननोंदीची पडून राहू नयेत म्हणून आवश्यक ती कार्यपध्दती आपले कार्यालयात राबवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहिती ची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की या प्रकरणात पंचायत समिती पातळीवर जन माहिती अधिकारी म्हणून ग्रामविकास अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी यांना जिल्हा परिषद प्राधिकरणाने हा कायदा अंमलात आल्यानंतर

घोषित केले आहे. तथापि अपिलार्थीस याची कल्पना नसल्याने अपीलार्थी यांनी एकाच वेळी वेगवेगळ्या पातळीवरील प्राधिकरणाकडे एकाच माहितीसाठी अर्ज केला आहे. तव्दतच अपीलार्थीस या प्रकरणात जन माहिती अधिकारी नक्की कोण आहे हे माहित नसल्याने अपीलार्थीने ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत व गट विकास अधिकारी पंचायत समिती कंधार या दोघांना जन माहिती अधिकारी संबोधून माहितीचा अर्ज केला आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपीलार्थीने ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीचा अर्ज ग्राह्य धरण्यात येत आहे. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रा वरुन असे आढळून आले आहे की अपीलार्थीने मूळ मागणी केलेल्या माहिती अर्जाचा दिनांक २९-०९-२००६ असा आहे. त्यामुळे अपीलार्थीस ही माहिती सर्वसामान्य परिस्थितीत दिनांक २५-१०-२००६ अखेर अगर तत्पुर्वी मिळणे आवश्यक होते अपीलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर गट विकास अधिकारी पंचायत समिती कंधार यांनी पाच दिवसाच्या आत ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय दिग्रस (बु.) यांचेकडे पाठवावयास हवा होता परंतु त्यांनी तसे न करता त्यांनी अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती ग्रामविकास अधिका-याकडून घेण्याचा प्रयत्न केला. अंतीमतः ही माहिती त्यांना दिनांक ०७-१२-२००६ रोजी उपलब्ध झाली व तदनंतर गट विकास अधिकारी पंचायत समिती कंधार यांनी दिनांक ०७-१२-२००६ रोजी अपीलार्थीस पत्र देऊन ही माहिती तयार असल्याचे व व्यक्तीशः घेऊन जाण्याचे सुचित केले. अपीलार्थीने ही माहिती देण्यापोटीच्या खर्चाची रक्कम रुपये १८० ही दिनांक २१-१२-२००६ रोजी स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद येथे जमा केली. तदनंतर अपीलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक २९-०१-२००७ रोजी त्यांना आवश्यक ती माहिती घेऊन गेले व ही माहिती मिळाल्याची पोहोच पावती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली.

वरील सर्व घटनाक्रम पाहिला असता अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यास टाळता येण्याजोगा विलंब जन माहिती अधिकारी यांच्याकडून झाला आहे तथापि अपीलार्थीने एकाच वेळी अनेक प्राधिकरणाकडे अर्ज केल्याने या माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये गोंधळ झाल्याचे दिसून येते. हा टाळता येण्याजोगा विलंब लावल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे. या ताकीदीची नोंद संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सेवा पुस्तकात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना पुढे अशा सूचना देण्यात येत आहेत की त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांची नांवे व हुद्दे दर्शविणारे फलक सहज सर्वांना दिसतील अशा पध्दतीने लावावेत व त्याच बरोबर माहिती अधिकार कायदा २००५ मधील त्यांचेकडे करण्यात आलेल्या अपिलावर विहित मुदतीत निर्णय होण्याच्या द्ृटीने व अपिले येथून पुढे गहाळ न होण्यासंदर्भात निश्चित व ठोस अशी कायम स्वरुपी उपाययोजना करावी.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिका-यास ताकीद देण्यात येत आहे याची नोंद त्यांच्यासेवा पुस्तकात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नागनाथ ग्यानोबा शिंदे मु. पो. दिग्रस तालुका कंधार जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती कंधार जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी घेण्यासंदर्भात.

३ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी घेण्यासंदर्भात.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १५६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २६ एप्रिल, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रकाश व्यंकटराव बुद्रुक<br>डायमंड वाच कंपनी जी.जी. रोड,<br>नांदेड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मधुबन महाराज हायस्कूल धनेगाव तालूका जि.नांदेड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २६ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.प्रकाश व्यंकटराव बुद्रूक (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मधुबन महाराज हॉयस्कूल, धनेगाव, जिल्हा- नांदेड, श्री.पांचाळ एम.एल ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) यांचे वतीने त्यांचे कार्यालयीन अधिक्षक, श्री.आर.बी. शिंदे उपस्थित आहेत. जनअपिललिय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जिपनां/ शिअ/मा-८/०७-०८/४८६२, दिनांक- २५-०४-

२००७ अन्वये श्री.आर.बी.शिंदे, राजपत्रीत अधिक्षक, शिक्षण विभाग,, जिल्हा परिषद, नांदेड  यांना जनअपिलिय अधिकारी यांचे वतीने सुनावणीसाठी  हजर राहण्यासाठी प्राधिकृत केले आहे.

आयोगा समोर सादर केलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीने प्रथम अर्जाची प्रत सादर केली नसल्यामुळे अपिलार्थीने  सदर अर्ज केंव्हा केला आह, हे कळावयास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने त्यांच्या  व्दितीय अपिलासोबत प्रथम अपिल केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस सदर शिक्षण संस्थेमध्ये सेवक या पदावर कार्यरत असणारे श्री.कोंडीबा गंगाधर घोरबांड यांची जन्म तारीख व वर्गा बाबत  जन माहिती अधिका-यांनी दोनदा माहिती दिली परंतू दोन्ही पैकी सत्य कोणती ?  ही माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते.

सदर माहिती अपिलार्थीने  मुख्याध्यापक, मधुबन महाराज हॉयस्कूल धनेगाव जिल्हा- नांदेड यांच्याकडून अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलावर प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १४-०८-२००६ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे व ती माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थी यांनी मान्य केले आहे.

आयोगा समोर आज सादर करण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीचे दिनांक- २४-०४-२००७ रोजीचे आयोगास उद्देशून केलेले निवेदन उपलब्ध आहे.

त्यामध्ये अपिलार्थीने त्यास या प्रकरणी संबंधिताकडून माहिती प्राप्त झाली आहे व आता माझी काही तक्रार नाही, असे लिहून दिले आहे व आयोगास अपिल रद्द करुन ते निकाली काढण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. याच बरोबर अपिलार्थीने दिनांक- १८ डिसेंबर, २००६ रोजी ५०/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर असे शपथपत्र लिहून दिले आहे की, हे अपिल त्यांनी श्री.के.जी.घोरबांड यांना त्रास देण्या करिता केले होते व त्याच शपथपत्रामध्ये त्यांनी श्री.के.जी.घोरबांड यांची बिनशर्त माफी मागितली, असल्याचेही दिसून येते.

अपिलार्थीस सर्व माहिती दिनांक- ३०-११-२००६ रोजी दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगा समोर कबुल केले आहे. तव्दतच अपिलार्थी यांनी सदर अपिल श्री.के.जी.घोरबांड यांना त्रास देण्याच्या उद्देशाने शपथपत्रावर कबूल केले असल्यामूळे तव्दतच सदर अपिल मागे घेत असल्याचे आयोगा कडे अर्ज केला आहे.

अपिलार्थीने दिनांक- ०१-०८-२००६ रोजी केलेल्या अपिलावर अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १४-०८-२००६ व २९-११-२००६ रोजी सुनावणी घेतली. त्याच वेळी हे प्रकरण संपूष्टात आले. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे या सुनावणी दिनांकाच्या पूर्वीच अर्ज केला असल्यामूळे व अपिलार्थीने आयोगास माहिती मिळाल्याचे कळविले नसल्यामुळे आयोगा तर्फे आज सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीमध्ये अपिलार्थीस माहिती मिळाली, अपिलार्थीने श्री.के.जी.घोरबांडे यांना त्रास देण्याच्या उद्देशाने ही माहिती मागितली असल्याचे शपथपत्रावर कबूल केले व आयोगाकडे हे

अपिल मागे घेवून सुनावणी रद्द करण्याची विनंती केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य माहिती आयोगा तर्फे आता कोणताही निर्णय अपेक्षित नसल्यामुळे हे अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २६ एप्रिल,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.प्रकाश व्यंकटराव बुद्रूक, डायमंड वॉच कंपनी, जी.जी.रोड, नांदेड, तालूका व जिल्हा- नांदेड

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मधूबन महाराज हॉयस्कूल धनेगाव तालूका जिल्हा- नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६४/२००७

निर्णय दिनांक २६-०४-२००७

श्री. खालेद युनूस अन्सारी, मार्फत दैनिक : अपीलार्थी
तहेलका टाईम्स, चावलवाला कॉम्प्लेक्स,
देगलूर नाका, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक :
मदिना तुल उलूम माध्यामिक शाळा
जगजीवनराम रोड, मदिनानगर, देगलूर नाका
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी : प्रतिवादी
माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. खालेद युनूस अन्सारी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे स्वतः, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मदिना

तुल उलूम माध्यामिक शाळा जगजीवनराम रोड, मदिनानगर, देगलूर नाका नांदेड श्री. हाशमी सैय्यद आझम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी अधीक्षक श्री. आर. बी. शिंदे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक १६-०१-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्या शाळेच्या शिक्षकासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> ‘‘ वरील प्रमाणे आणि वरील कालावधीत शिक्षकांची नेमणकबाबत ज्या वृत्तपत्रात जाहिरात दिली होती त्या वृत्तपत्राची छायांकीत प्रत तसेच जिल्हा रोजगार कार्यालया कडून मागितलेल्या उमेदवारांची यादी प्रत्येक वर्ष प्रत्येक जागेसाठी, मुलाखतीकरिता आलेल्या उमेदवारांची नांवे व पत्ते.’’

याच बरोबर अपीलार्थीने माहितीच्या तपशीलामध्ये शिक्षकांची नांवे, वय, शैक्षणिक पात्रता, जात, याचीही माहिती मागविल्याचे त्यांच्या अर्जावरुन दिसून येते. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाची पोहोच अपीलार्थीने आज आयोगास दाखविली.

वरील अर्जाव्दारे मागितलेली कोणतीही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दिनांक १६-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. याच दिवशी अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाने एक पाकिट प्राप्त झाले. या रजिस्टर्डचा एडी क्रमांक २४०५ दिनांक १४-०२-२००६ असा आहे. तथापि

या पाकिटामध्ये अपिलार्थीस फक्त दोन कोरे कागद प्राप्त झाले असल्याचे अपिलार्थीस आढळून आले.  त्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिका-यास तसेच जन माहिती अधिका-यास त्याच दिवशी एक वेगळे पत्र देऊन या पाकिटामध्ये फक्त दोन कोरे कागद त्यांना प्राप्त झाल्याची माहिती दिली आहे.  प्रथम अपीलीय अधिका-याकडे अपील करण्याचे कारण म्हणजे अपीलार्थीस आवश्यक ती माहिती न मिळाल्याने फक्त दोन कोरे कागद मिळाल्याचे, दर्शविले आहे.  या खुलाशावर जन माहिती अधिकारी यांचा खुलासा विचारला असता त्यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील पत्र क्र. ३३६, दिनांक १४-०२-२००६ अन्वये दिलेले एक पत्र दाखविले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी अपीलार्थीस असे कळविले आहे की, '' आज पर्यत माहितीच्या अधिकारात अधिनियम २००५ चे अनुसार माहिती अधिकारी नेमणुकीबद्दल शासनाकडून किंवा शिक्षण खात्याकडून निर्देश न मिळाल्यामुळे सदर अधिनियम खाली मी उत्तर देण्यास असमर्थ आहे.'' तथापि क्रमांक ३३६ दिनांक १४-०२-२००६ चे हे पत्र अपीलार्थीस पोहोचले नसल्याचे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थीने केलेल्या दिनांक १६-०२-२००६ रोजीच्या अपीलास अनूसरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या अपीलाची कोणतीही सुनावणी घेतली नाही परंतु अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडील पत्र दिनांक १२-०१-२००६ अन्वये असे कळविले आहे की आपणास आवश्यक असलेली सर्व माहिती संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी. अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही.  याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, अपीलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत सुनावणी घेतली नाही म्हणून व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य

आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या व्दितीय अपीला मध्ये अपीलार्थीने त्यांचे मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे दिसून आले की, संबंधित शिक्षण संस्थेने माहिती अधिकार कायदा ऑक्टोंबर २००५ मध्ये पारीत होऊनही विहित वेळेत जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या नेमणुका केल्या नाहीत.  अशा नेमणुका झाल्या आहेत किंवा नाही हे पाहण्याची तसदी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने घेतली नाही. जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी यांनी दिनांक १२ एप्रिल २००६ रोजी अपीलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घ्यावी असा उल्लेख केला आहे.  संबंधित मुख्याध्यापकाची अद्यापही सदर संस्थेने जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली नाही याची येथे प्रामुख्याने नोंद घेणे आवश्यक आहे.  या प्रकरणी अंतीमतः अपीलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती शिक्षण अधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नांदेड यांनी दिनांक २६ जून २००६ रोजी दिल्याचे दिसून येते.

माहिती अधिकार कायदा लागू होऊनही माहिती अधिकार कायदा कलम ५ मधील तरतुदींचे पालन जिल्हा परिषदेचे शिक्षण खात्याने किंवा सदरील संस्थेने केली नसल्याचे दिसून येते ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे असे आयोगाचे मत आहे.  तेव्हा असे आदेशित करण्यात येते की सदर शैक्षणिक संस्थाचे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी नेमण्यास कोणत्या पातळीवर व का उशीर झाला त्याची चौकशी शिक्षण संचालकांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याच्या आत करावी.  याच बरोबर जिल्हा परिषद नांदेड शिक्षण खात्याचा कारभार किती ढिसाळपणे चालला आहे हेही या प्रकरणातून उघड होत आहे. शिक्षण अधिकारी नांदेड यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली

असलेल्या सर्व शिक्षण संस्थामध्ये माहिती अधिकार कायदा २००५ च्या कलम ५ मधील तरतुदींची अंमलबजावणी कसोशीने होत आहे किंवा कशी हे पाहणे जरुरीचे होते तथापि त्यांनीही आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येते. सचिव (शिक्षण) यांनी शिक्षण अधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नांदेड यांच्या या वर्तनाची यथायोग्य नोंद घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे. तव्दतच सदर शिक्षण संस्थेस शासनाकडून मिळणारी मदत आदेशित करण्यापुर्वी सदर संस्थेने माहिती अधिकार कायद्याप्रती दाखविलेला अनादर लक्षात घेऊन संस्थेवर योग्य ती कडक प्रशासकीय कारवाई करावी.

जिल्हा परिषद नांदेड यांचे कडील माध्यमिक शिक्षण विभाग व सदर शिक्षण संस्था यांच्या गलथान पणाचा फटका अपीलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती विहित केलेल्या कायद्याव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा उशीरा मिळत आहे त्याबद्दल सदर संस्थेच्या जन माहिती अधिका-यावर सदर संस्थेने योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी आणि या कार्यवाहीचे नियत्रण शिक्षण अधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नांदेड यांनी करावे व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून दोन महिन्यात पाठवावा. अपीलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे त्यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मदिना तुल उलूम माध्यामिक शाळा जगजीवनराम रोड, मदिनानगर, देगलूर नाका नांदेड या शैक्षणिक संस्थाचे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी नेमण्यास

कोणत्या पातळीवर व का उशीर झाला त्याची चौकशी शिक्षण संचालकांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याच्या आत करावी.

३. मदिना तुल उलूम माध्यामिक शाळा जगजीवनराम रोड, मदिनानगर, देगलूर नाका नांदेड या संस्थेने माहिती अधिकार कायद्याप्रती दाखविलेला अनादर लक्षात घेऊन संस्थेवर सचिव (शालेय शिक्षण) यांनी योग्य ती कडक प्रशासकीय कारवाई करावी.

४. मदिना तुल उलूम माध्यामिक शाळा जगजीवनराम रोड, मदिनानगर, देगलूर नाका नांदेड या संस्थेच्या जन माहिती अधिका-यावर सदर संस्थेने योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी आणि या कार्यवाहीचे नियत्रण शिक्षण अधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नांदेड यांनी करावे व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून दोन महिन्यात पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खालेद युनूस अन्सारी, मार्फत दैनिक तहेलका टाईम्स, चावलवाला कॉम्प्लेक्स, देगलूर नाका, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मदिना तुल उलूम माध्यामिक शाळा जगजीवनराम रोड, मदिनानगर, देगलूर नाका नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी घेण्यासंदर्भात.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी घेण्यासंदर्भात.

४ शिक्षण संचालक, मध्यवर्ती इमारत, बी. जे. मार्ग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १६५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २६ एप्रिल, २००७.

१. श्री.मनोहर माधवराव थोरात .. अपिलार्थी.
घर नंबर २-२-१२४, देगाव चाळ,
पोस्ट वजिराबाद, नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा नायब .. प्रतिवादी
तहसीलदार (पुरवठा) विभाग
तहसील कार्यालय,अर्धापुर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
तहसीलदार,अर्धापुर.

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २६ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.मनोहर माधवराव थोरात (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (पुरवठा) विभाग, तहसील कार्यालय, अर्धापूर श्री.हबर्डे देविदास किशन ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत तर जन अपिलिय अधिकारी तथा तहसीलदार,अर्धापूर ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- २३-०९- २००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती ची मागणी केली होती.

''अर्धापूर तालुक्यातील एकूण स्वस्त धान्य दुकानदारांना शासनाकडून वितरण केलेल्या रोजगार हमी योजने अंतर्गत तसेच दारिद्रय रेषेखालील योजने अंतर्गत वाटप करण्यासाठी शासनाकडून अर्धापूर तालुक्याच्या शासकिय गोडाऊन किपरला किती गहु व तांदूळ शासनाकडून देण्यात आले व शासनाकडून आलेले मालापैकी वरील योजने अंतर्गत किती गहु व तांदूळ स्वस्त धान्य दुकानदारांना वाटप करण्यात आले याचा तपशील शासकिय गोडावून किपरकडून गहू व तांदुळाच्या वितरण व स्टॉक रजिस्टराच्या सत्यप्रती मिळणे बाबत.''

सदरील माहिती अपिलार्थीने माहे एप्रिल, २००३ ते ऑगस्ट २००६ हया कालावधीमधील मागितली असून ती त्यांनी साधारण टपालाव्दारे अपेक्षीली आहे.

अपिलार्थीने वरील जनमाहिती अधिकारी यांना माहिती मागवूनही जनमाहिती अधिकारी यांनी त्यास सदर माहिती आजतागायत दिली नाही. असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे व उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनीहि ही वस्तुस्थिती आज झालेल्या सुनावणीमध्ये कबुल केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणताहि प्रतिसाद न मिळाल्यामूळे अपिलार्थीने प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे दिनांक- ०९-११-२००६ रोजी

या  माहितीच्या मागणी संदर्भात प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये देखील अपिलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रथम अपिलावर अपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगाच्या निदर्शनास आणले समोर कबुल केले आहे. त्याच बरोबर आज उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामध्ये प्रथम सुनावणी घेतल्याबाबतचा कोणताही पुरावा व कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे.

जनमाहिती अधिकारी  व जनअपिलिय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगा कडे २४-०१-२००७ अशा दिनांकाचे व्दितीय अपिल केले आहे. सदर अपिल आयोगाच्या कार्यालयास दिनांक- १५-०२-२००७ रोजी प्राप्त झाले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांना माहिती न देण्यांच्या कृती संदर्भात कोणतेही समर्थनीय खुलासा  करता आलेला नाही. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहीत मुदतीत  नव्हे तर आज सुनावणीच्या तारखे पर्यंत देखिल पुरविली गेली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक- ३०-०९-२००६ रोजी

प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेल्या नस्तीवरुन दिसून येत आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती कोणत्याही वैध कारणाशिवाय विहित मुदतीत न दिल्याचे या प्रकरणी पूर्णतः सिध्द होत असल्याने असे आदेशीत करण्यात येते की,

(१) अपिलार्थीने मुळ अर्जात मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दहा दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.(त्या प्रमाणे उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनी सूनावणीमध्ये कबूल केले आहे.)

(२) जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ च्या संदर्भात दाखविलेल्या अनादरा बद्दल व अपिलार्थीस कोणत्याही वैध कारणास्तव विहित कालावधीत माहिती न देऊन विलंब लावल्याबाबत माहिती अधिकार कायदा २००५ कलम २० (१) मधील तरतुदीनुसार प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण २५,०००/ इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी कर्तव्यपरायणता दाखविला नसल्याचे सिध्द होत असल्याने माहिती अधिकार कायदा २००५, कलम २० (२)मधील तरतुदी नुसार संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द विभागीय आयुक्त, महसूल, औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल नियम) १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कार्यवाही, करण्याची शिफारास करण्यात येत आहे. तसेच अपिलिय अधिकारी यांनी या

प्रकरणी त्यांच्याकडे अपिल दाखल झाल्या नंतर त्यांनी माहिती अधिकार कायद्याच्या कलम १९ (१) जी प्रथम सुनावणी घ्यावयास हवी होती ती घेतली नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. याची महसूल आयुक्तांनी त्यांच्या पातळीवर योग्य ती दखल घ्यावी.

महसूल विभागातील पुरवठा शाखेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे वारंवारं अपिल व तक्रारी दाखल होत आहेत. अशा परिस्थीतीत विभागातील पुरवठा अधिकारी व त्यांच्या हाता खालील काम करणारे तहसीलदार, नायब तहसीलदार यांना माहिती अधिकारी कायदा २००५ च्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/ प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्या संदर्भात महसूल आयुक्त यांनी गांर्भीयाने विचार करावा, असेही त्यांना या प्रकरणी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (८) (जे) अन्वये सूचित करण्यात येत आहे. तव्दतच औरंगाबाद महसूल विभागा मार्फत प्रत्येक शासकीय गोडावून मध्ये किती प्रकारच्या धान्याचा किती साठा उपलबध आहे. याची माहिती नियमितपणे त्यांच्या बेबसाईटवर प्रसिध्दीसाठी ठेवण्याच्या संदर्भात त्यांनी विचार करावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी मुळ मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही वैध कारणा शिवाय अद्यापपावेतो माहिती न दिल्यामूळे त्यांना या विलंबा बाबत प्रतिदिन २५०/- या

प्रमाणे एकूण २५,०००/- रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील रक्कम योग्य त्या शिर्षाखाली जिल्हाधिकारी नांदेड यांनी जमा करावी व त्याप्रमाणे अहवाल आयोगास कळवावा.

औरंगाबाद
दिनांक २६ एप्रिल,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.मनोहर माधवराव थोरात, घर नंबर- २-२-१२४, देगाव चाळ, पोस्ट वजिराबाद, नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, पुरवठा विभाग, अर्धापूर -यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. विभागीय आयुक्त यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७/२००७

निर्णय दिनांक २६-०४-२००७

श्री. कोकणे माधव गोविंदराव मुख्याध्यापक : अपीलार्थी
व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक :
व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा गट : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी पंचायत समिती बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी आणि जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर बीड हे गैरहजर आहेत तर अपीलीय

अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती बीड श्री. एस. बी. पाखरे हे हजर आहेत.

राज्य आयोगाकडे दाखल झालेल्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपीलाची पाहणी केली असता असे आढळून येते की हे अपील संबंधित जन माहिती अधिकारी श्री. कोकणे यांनी, गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती बीड तथा जन अपीलीय अधिकारी यांचे समोर झालेल्या सुनावणीच्या निकाला संदर्भात केले आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी ही सुनावणी या प्रकरणातील मूळ अर्जदार श्री. अजित एम. देशमुख व मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर बीड श्री. कोकणे यांच्यातील वादा संदर्भात घेतली होती. या प्रकरणातील मूळ अर्जदार श्री. अजित एम. देशमुख यांच्या अर्जाचा निपटारा जन अपीलीय अधिकारी यांच्या कडील प्रथम सुनावणीत झाला असल्यामुळे त्यांनी राज्य आयोगा कडे व्दितीय अपील केले नाही. तथापि या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यास लागलेला विलंबाबाबत जन माहिती अधिकारी श्री. कोकणे हे शास्तीस पात्र ठरल्याचा उल्लेख या निकालामध्ये करण्यात आला आहे. यावर व्यथित होऊन श्री. कोकणे यांनी माहिती अधिकार कायदा १९ (३) अन्वये आयोगाकडे अपील दाखल केले आहे. श्री. कोकणे यांची ही कृती चुकीची व कायद्यास धरुन नाही.

तव्दतच आयोगाकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (३) अन्वये अपील फक्त मुळ अर्जदारच करु शकतो हे लक्षात घेता मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर बीड श्री. कोकणे माधव गोविंदराव यांचे आयोगाकडे केलेले दिनांक २६-०६-२००६ रोजीचे व्दितीय अपील माहिती अधिकार कायदा कलम १९ (३) अन्वये वैध ठरत नसल्याने ते फेटाळण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कोकणे माधव गोविंदराव मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीड

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती बीड

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ११२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २७ एप्रिल, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मल्हारी मारोती फसके,<br>व्दारा/- गोरे निवास, बस स्टँडच्या मागे, नेताजी शाळेजवळ, प्रशांतनगर, अंबाजोगाई, जिल्हा-बीड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव,<br>सेवा सहकारी संस्था म.बलसारोळा, तालूक-केज, जिल्हा-बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा<br>सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालूका-केज, जिल्हा-बीड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २७ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.मल्हारी मारोती फसके (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा सचिव, सेवा सहकारी संस्था म.बनसारोळा, तालूका-केज, जिल्हा-बीड ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत. तर जन अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका-केज, जिल्हा-बीड

श्री.जी.के.परदेशी ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थी यांनी दिनांक- ०७-१०-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील तेरा मुद्यां संदर्भात व्यक्तिशः माहिती मागविली होती.

"१) १ जानेवारी २००२ ते ६ नोव्हेंबर, २००६ या वर्षात आपल्या संस्थेमार्फत सभासदांना केलेला पतपुरवठा खरीप ऊस, यादीनिहाय नविन व जुने सभासदांच्या वाटपाबाबतची माहिती देणे (सोबत सभासदांकडुन घेतलेले कागदपत्रे साक्षांकित देणे.)

२) नविन सभासद किती केले.

३) सभासदांसाठी आपणाकडे आलेले अर्ज किती फेटाळले, कोणत्या कारणासाठी त्या पत्राच्या सत्यप्रती.

४) ऊस पत कर्जासाठी प्रत्यक्ष ऊस असलेल्या किती सभासदांना कर्ज दिलेले नाही, कोणत्या कारणांसाठी.

५) आपल्या स्तरावर डिक्लरेशन फॉर्म मध्ये जगलरी करून किती सभासद ऊस पत/किसान क्रेडिट कार्डवर कर्ज दिले त्यांची यादी.

६) आपल्या संस्थेचे तेरीज पत्रक व ताळेबंद पत्रक देणे सन २००१-२००६ पर्यंतचे.

७) बँक कर्ज पुरवठयाचे धोरणाच्या आपणांस आलेल्या विषयी मार्गदर्शक सुचनांच्या प्रती.

८) स्वस्त धान्य दुकानांत होत असलेल्या रॉकेल, साखर, गहु, तांदुळ, माणसी किती व कोणांस वाटप केले सन २००० ते नोव्हेंबर २००६ पर्यंतची माहिती द्यावी. १५ दिवसाला किती पुरवठा होतो व महिन्यांस किती याचा तपशिल द्यावा.

९) आतापर्यंत घेतलेल्या ठरावाच्या प्रती देणे, सन जानेवारी २००० ते २००६ पर्यंतचे सहा वर्षाचे.

१०) पीक विमा लागु झालेल्या वर्षातील लाभधारकांची यादी.

११) शासन व्याज माफीची सभासदांची यादीनिहाय माहिती देणे.

१२) जिल्हा मध्यवर्ती बँकेकडुन मंजूर केलेली नविन सभासदांसाठी ऊसपत कर्ज मंजूर करण्यासाठी दिलेली यादी.(क.म. पत्रक सन २००६-०७ वर्षाकरिता)

१३) सेवा सह.सो.करंट खात्यावर जाने. १९८१ ते २००६ पर्यंतचा झालेला व्यवहार चेकनंबर प्रायोजनासह देणे. ”

सदर माहितीचा कालावधी ऑक्टोंबर, २००० ते नोव्हेंबर, २००६ असा अपेक्षिला आहे.

अपिलार्थीस त्यांने वरील अर्जा व्दारे मागणी केलेली माहिती विहीत मुदतीत न मिळाल्यामूळे दिनांक- १४-११-२००६ रोजी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले.

या अपिलाची सुनावणी अपिलिय अधिकारी यांनी दोन सुनावणी अनुक्रमे २८-११-२००६ व ०४-१२-२००६ रोजी घेतल्या. या सुनावणी मध्ये जन अपिलिय अधिकारी यांना, जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीहि माहिती दिली नसल्याचे आढळून आल्यामूळे त्यांनी जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीस दिलेल्या निर्णयाच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे सूचीत केले व जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिल अर्ज दिनांक- ०७-१०-२००६ ची छायांकित-प्रत दिली आहे.

तथापि या निर्णया नंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०७-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल दाखल केले आहे.

या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बनसारोळा तालूका-केज, जि.बीड अंतर्गत करोडो रुपयाचा अपहार झाला असून फक्त २६ माणसाच्या तक्रार अर्जात उल्लेख असलेल्या १२,९२,०८०/- रुपयाचा भ्रष्टाचार झाला असल्याचे सहकार खात्याच्या चौकशीत सिध्द झाला आहे. संस्थेचे सभासद ४,००० असल्याने उर्वरित सभासदाच्या नावाने झालेला भ्रष्टाचार उघड करण्यासाठी माहिती संस्थेने व अपिलिय अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती दिली नाही. त्याच बरोबर हा दावा चालविण्यापोटी येणा-या खर्चाची मागणी अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस द्यावी, असे व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, आजची सुनावणी ही या प्रकरणातील व्दितीय सुनावणी असून प्रथम सुनावणी दिनंक- ०५ एप्रिल, २००७ रोजी झाली होती. हया सुनावणीच्या वेळेस जनमाहिती अधिकारी गैरहजर राहीले आहेत. त्यामूळे सुनावणीची पुढील तारीख जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- २७ एप्रिल, २००७ अशी देण्यात आली. प्रथम सुनावणीस हजर राहण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांना सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, केज यांच्या कार्यालयाकडून त्यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र.सनिके/मा.आ/सेसोमबनसारोळा/ रामाआ/७७९/०७, दिनांक- १४-०३-२००७ कळविलेले आहे. त्याच बरोबर आजच्या सुनावणीस हजर राहण्याच्या संदर्भात देखील संबंधित जनमाहिती अधिकारी यांना कळविल्याचे जनअपिलिय अधिकारी सुनावणीमध्ये कबुल करीत आहेत. राज्य माहिती आयोगाकडे, सेवा सहकारी संस्था म. बनसारोळा, तालूका-केज, जिल्हा-बीड यांच्याकडील आर्थीक व्यवहारा संदर्भात बरीच अपिले प्राप्त झाली असून आता पर्यंत या अपिलाच्या संदर्भात झालेल्या दोन्हीही सुनावणी करिता जनमाहिती अधिकारी हे गैरहजर राहिले आहेत. त्याचबरोबर सदर संस्था ही शासकीय प्राधिकरण असल्याचे जनअपिलिय अधिकारी यांनी आज दिनांक- २७-०४-२००७ रोजी आयोगाकडे सुनावणीच्या वेळेस दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते. सदर सहकारी संस्था ही शासकीय प्राधिकरण कशी यांचा जनअपिलिय अधिकारी यांनी पुरेशा विस्ताराने ऊहापोह या पत्रामध्ये व सुनावणीच्या वेळी केलेला आहे.

आज सुनावणीस ठेवण्यात आलेल्या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी हजर राहून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांना आयोगाने दुस-यांदा पुरेपूर संधी दिली होती. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीसाठी अर्ज देवून वेळही मागवून घेतली नाही अथवा व्दितीय अपिलाच्या सुनावणीसाठी दुस-यांदा आयोगा समोर हजर झाले नाहीत. तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी घेवून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती १५ दिवसात देण्याचे आदेशीत करुनही जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या अर्जात मागणी केली माहिती अपिलार्थीस देण्यांच्या दृष्टीने काहीही प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. यावरुन आवश्यक ती माहिती कोणत्याही वैध कारणा शिवाय नाकारण्यात आल्याचे स्पष्ट होते. सबब असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्या नंतर १० दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी. तसेच अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती न पुरविल्या बद्दल किंवा त्या दृष्टीने कोणताही प्रयत्न न केल्याबद्दल जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) हया तरतुदी प्रमाणे प्रतिदिन २५०/- रुपये असे एकूण २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रकम संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी एकाच हप्त्यात शासकीय कोषागारात योग्यत्या शिर्षाखाली भरावयाची आहे. सदर जनमाहिती अधिकारी यांनी ही शास्तीची रक्कम एका महिन्याच्या आत भरल्याची खात्री जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी करावी व त्याप्रमाणे आयोगा कडे अहवाल कळविण्यात यावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाच्या आत अपिलार्थीने मूळ अर्जात मागणी केलेली माहिती विनामुल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो मागणी केलेली माहिती कोणत्याही वैध कारणाशिवाय न दिल्यामूळे त्यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी ती एका महिन्याचे आत शासकीय कोषागारात जमा करावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २७ एप्रिल,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.मल्हारी मारोती फसके, व्दारा- गोरे निवास बस स्टॅडच्या मागे नेताजी शाळेजवळ, प्रशांतनगर, अंबाजोगाई.

२ जनमाहिती अधिकारी तथा सचिव, बनसारोळा सेवा सहकारी सोसायटी लि. बनसारोळा तालूका-केज, जिल्हा-बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका-केज, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ११३/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २७ एप्रिल, २००७.

| | | |
|---|---|---|
| १. श्री.तुकाराम मारोती जाधव, द्वारा/- गोरे निवास, बस स्टँडच्या मागे, नेताजी शाळेजवळ, प्रशांतनगर, अंबाजोगाई, जिल्हा-बीड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, सेवा सहकारी संस्था म.बलसारोळा, तालूक-केज, जिल्हा-बीड. | .. | प्रतिवादी |
| २. जन अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालूका-केज, जिल्हा-बीड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २७ एप्रिल,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.तुकाराम मारोती जाधव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा सचिव, सेवा सहकारी संस्था म.बनसारोळा, तालूका-केज, जिल्हा-बीड ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत. तर जन अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका-केज, जिल्हा-बीड

श्री.जी.के.परदेशी ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थी यांनी दिनांक- २८-०९-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा मुद्यांवर माहिती मागविली होती.

"१) आपल्या संस्थेमार्फत सभासदांना केलेला पतपुरवठा खरीप ऊस, यादीनिहाय नविन व जुने सभासदांच्या वाटपाबाबतची माहिती देणे (सोबत सभासदांकडुन घेतलेले कागदपत्रे साक्षांकित देणे.)

२) नविन सभासद किती केले.

३) सभासदांसाठी आपणाकडे आलेले अर्ज किती फेटाळले, कोणत्या कारणासाठी त्या पत्राच्या सत्यप्रती.

४) ऊस पत कर्जासाठी प्रत्यक्ष ऊस असलेल्या किती सभासदांना कर्ज दिलेले नाही, कोणत्या कारणांसाठी.

५) आपल्या स्तरावर डिक्लरेशन फॉर्म मध्ये जगलरी करून किती सभासद ऊस पत/किसान क्रेडिट कार्डवर कर्ज दिले त्यांची यादी.

६) आपल्या संस्थेचे तेरीज पत्रक व ताळेबंद पत्र देणे."

सदर माहितीचा कालावधी ऑक्टोंबर, २००४ ते १५ ऑगस्ट २००६ असा अपेक्षिला आहे.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः मागितली होती.

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याने व त्याने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जास जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक- १४-११-२००६ रोजी जनअपिलिय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले.

या अपिलामध्ये, अपिलार्थीने " माहिती मिळण्याच्या विनंती अर्जात दिनंक- ०७-१०-२००६ वर काहीही कार्यवाही झाली नाही व माहिती दिली नाही. तव्दतच सदर जनमाहिती अधिकारी  यांच्याकडून मागितलेली माहिती  जाणूनबुजून व चेअरमनच्या सांगण्यावरुन माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी हे टाळाटाळ करीत आहेत." असे कारण दिले आहे.

अपिलार्थीच्या या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २८-११-२००६ व ०४-१२-२००६ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा त्यांने माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये केलेल्या दिनांक- ०७-१०-२००६ ची अर्जाची  छायाकिंत प्रत देवून अपिलार्थीस ही माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पंधरा दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिले. हे आदेश प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ०५-१२-२००६ रोजी निर्गमीत केले आहेत.

तथापि या निर्णया नंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०७-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल दाखल केले आहे.

या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. बनसारोळा तालूका-केज, जि.बीड या संस्थेचा भ्रष्टाचार उघड करण्यासाठी व माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी, असे कारण दिले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, आजची सुनावणी ही या प्रकरणातील व्दितीय सुनावणी असून प्रथम सुनावणी दिनंक- ०५ एप्रिल, २००७ रोजी झाली होती. हया सुनावणीच्या वेळेस जनमाहिती अधिकारी गैरहजर राहीले आहेत. त्यामूळे दिनांक- २७ एप्रिल, २००७ रोजी सुनावणीची तारीख जनमाहिती अधिकारी यांना देण्यात आली. या दोन्हीही सुनावणीस हजर राहण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांना सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, केज यांच्या कार्यालयाकडून त्यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र.सनिके/मा.आ/सेसोमबनसारोळा/ रामाआ/७७०/०७, दिनांक- १४-०३-२००७ अन्वये कळविलेले आहे. दुस-या पत्रामध्ये व्दितीय अपिल सुनावणीचे ठिकाण व वेळ या बाबतही जनमाहिती अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे. त्याच बरोबर आजच्या सुनावणीस हजर राहण्याच्या संदर्भात देखील संबंधित जनमाहिती अधिकारी यांना कळविल्याचे जनअपिलिय अधिकारी सुनावणीमध्ये कबुल करीत आहेत. त्याच बरोबर सदर संस्था ही शासकीय प्राधिकरण असल्याचे जनअपिलिय अधिकारी यांनी आज दिनांक- २७-०४-२००७ रोजी आयोगाकडे सुनावणीच्या वेळेस दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते. सदर सहकारी संस्था ही शासकीय प्राधिकरण कशी यांचा जनअपिलिय अधिकारी यांनी पुरेशा विस्ताराने ऊहापोह या पत्रामध्ये व सुनावणीच्या वेळी केलेला आहे. राज्य माहिती आयोगाकडे, सेवा सहकारी संस्था म. बनसारोळा, तालूका-केज, जिल्हा-बीड यांच्याकडील आर्थीक व्यवहारा संदर्भात बरीच अपिले प्राप्त झाली असून आता पर्यंत या अपिलाच्या संदर्भात झालेल्या सुनावणी करिता जनमाहिती अधिकारी हे सतत दोनदा गैरहजर राहिले आहेत.

आज सुनावणीस ठेवण्यात आलेल्या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी हजर राहून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांना पुरेरपूर संधी आयोगाने दुस-यांदा दिली होती. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीसाठी अर्ज देवून वेळही मागवून घेतली नाही अथवा व्दितीय अपिलाच्या सुनावणीसाठी दुस-यांदा आयोगा समोर हजर झाले नाहीत. तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी घेवून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती १५ दिवसात देण्याचे आदेशीत करुनही जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या अर्जात मागणी केली माहिती अपिलार्थीस देण्यांच्या दृष्टीने काहीही प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी पुरेशी संधी मिळून देखील जनमाहिती अधिकारी यांनी माहिती न देवून माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) अन्वये स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने दिनांक- २८-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्या नंतर १० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती न  पुरविल्या बद्दल किंवा त्या दृष्टीने कोणताही प्रयत्न न केल्याबद्दल जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१)  तरतुदी प्रमाणे प्रतिदिन २५०/- रुपये असे एकूण २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रकम संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी एकाच हप्त्यात शासकीय कोषागारात योग्यत्या शिर्षाखाली भरावयाची आहे. सदर जनमाहिती अधिकारी यांनी ही शास्तीची रकम एका महिन्याच्या आत भरल्याची खात्री जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी

करावी व त्याप्रमाणे आयोगा कडे अहवाल कळविण्यात यावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाच्या आत अपिलार्थीने मूळ अर्जात मागणी केलेली माहिती विनामुल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो, मागणी केलेली माहिती कोणत्याही वैध कारणाशिवाय न दिल्यामूळे त्यांना एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी ती एका महिन्याचे आत शासकीय कोषागारात जमा करावी.

औरंगाबाद
दिनांक २७ एप्रिल,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.तुकाराम मारोती जाधव, व्दारा- गोरे निवास बस स्टॅडच्या मागे नेताजी शाळेजवळ, प्रशांतनगर, अंबाजोगाई.

२ जनमाहिती अधिकारी तथा सचिव, बनसारोळा सेवा सहकारी सोसायटी लि. बनसारोळा तालूका-केज, जिल्हा-बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालूका-केज, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपिल/सिआर/११९/०७

निर्णय दिनांक २१-०४-२००७

| | | |
|---|---|---|
| मोहमद अन्वरउल्लाखान पिता मो. बरकतउल्लाखान डि. व्हिजीलन्स ऑफिसर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक वन विभाग (तेंदूपाने) नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक वन विभाग नांदेड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार स्वतः श्री. मोहमद अन्वरउल्लाखान पिता मो. बरकतउल्लाखान (यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी नांदेड तथा सहाय्यक वन संरक्षक वन विभाग (तेंदूपाने) नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. एस. व्ही. मानकावार आणि तत्कालीन जन

अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक वन विभाग नांदेड (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. व्ही. जे. वरवंटकर हे हजर आहेत. मुख्य वन संरक्षक यांच्या वतीने विभागीय वन अधिकारी (नियोजन) मुख्यालय औरंगाबाद श्री. प्र. ग. राहूरकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदार यांनी सर्व प्रथम दिनांक २२-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम या योजने अंतर्गत २००५-०६ व २००६-०७ या कालावधीमध्ये झालेल्या कामासंदर्भात माहिती मागविली होती. या माहितीच्या मागणीमध्ये भोकर, इस्लापूर, बोधडी, रोहयो इस्लापूर या वन क्षेत्रात झालेल्या कामाची गाववार माहिती, कामाचा खर्च, व मस्टरच्या झेरॉक्स प्रतीसह व अंदाजपत्रकाच्या प्रतीसह यांची माहिती अर्जदाराने व्यक्तीशः अपेक्षिली होती. अर्जदाराने दिनांक २२-११-२००६ रोजी माहिती मागविल्यानंतर अर्जदारास दिनांक २१-१२-२००६ पुर्वी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायद्यानुसार देणे अपेक्षित आहे तथापि त्यांनी या अर्जाची मुळात दखलच दिनांक २७-०१-२००७ रोजी घेतल्याचे दिसते. तत्पुर्वी त्यांनी अर्जदारास दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये रुपये ४५७३४ इतक्या रकमेचा भरणा, सदर माहिती देण्यापोटी लागणारा खर्च, म्हणून भरण्याचे सुचित केल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिका-याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अर्जदार यांनी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे कलम १९ (१) अन्वये अपील करणे अपेक्षित होते तथापि अर्जदाराने अशा प्रकारचे अपील केलेले नाही व त्यांनी माहिती अधिकार कायदा कलम १८ मधील तरतुदीच्या अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी सरळ अर्ज केला असून तक्रार निवारणासाठी दाद मागितली आहे.

या अर्जाची सुनावणी प्रथमतः दिनांक १०-०४-२००७ रोजी ठेवण्यात आली होती तथापि त्या दिवशी जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे दोघेही गैरहजर असल्यामुळे या अर्जाची व्दितीय सुनावणी दिनांक २१-०४-२००७ रोजी ठेवण्यात आली. आज सुनावणीमध्ये अर्जदार यांनी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिनांक ०३-०२-२००७ रोजी मिळाली असल्याचे आयोगासमोर शपथपत्रावर कबूल केले आहे.

अर्जदाराच्या त्यांच्या मुळ मागणीचे आता निराकरण झाले असल्यामुळे अर्जदाराचा अर्ज आता निकाली काढण्यात येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये त्यांच्याकडे दाखल झालेल्या अशा प्रकारच्या माहिती अर्जाची विहित मुदतीत दखल घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे. तव्दतच अर्जदार यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) चा अवलंब न करता आयोगाकडे तक्रार दाखल करणे हे चूक आहे याची जाणीव त्यांना करुन देण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ एप्रिल २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमद अन्वरउल्लाखान पिता मो. बरकतउल्लाखान डि. व्हिजीलन्स ऑफिसर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक वन विभाग (तेंदूपाने) नांदेड

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक वन विभाग नांदेड

४ श्री. प्र. ग. राहूरकर, विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य वन संरक्षक कार्यालय, औरंगाबाद मुख्यालय औरंगाबाद

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती